मासिक अंक
(खाजगी वितरण)

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

# महाआयटी संवाद

पाचवा अंक - जुलै 2026

## महाडीबीटी 2.0

पारदर्शक, कागदविरहित आणि
स्मार्ट सार्वजनिक सेवांद्वारे
प्रत्येक नागरिकाचे सक्षमीकरण



**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...


**संपादकीय** 1
महाडीबीटी 2.0 : डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून कल्याणकारी व्यवस्थेत परिवर्तन

**मुख्य लेख: महाडीबीटी 2.0** 2
बुद्धिमान डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून थेट लाभ हस्तांतरण व्यवस्थेची फेररचना

**कौशल्य क्षेत्रातील परिवर्तन** 11
भविष्यासाठी सज्ज कौशल्यांसाठी TISS-SSE आणि महाआयटी यांच्यात धोरणात्मक भागीदारी

**तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी** 13
डिजिटल प्रशासन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना गती देण्यासाठी महाआयटी आणि सी-डॅक यांच्यात भागीदारी

**परिवर्तनकर्ते** 15
बदल घडवणारे व्यक्तिमत्त्व आरती दीपक देवमणे: ग्रामीण डिजिटल परिवर्तनाच्या शिल्पकार

**तंत्रज्ञानाला लाभली सहृदयतेची साथ** 17
नाशिकमधील गरजू नागरिकांना ‘घरपोच जीवन प्रमाणपत्र’ उपक्रमाचा लाभ

**सुशासन घरपोच** 19
आधार नोंद सुधारणा करून व्हीएलईने दिला ज्येष्ठ नागरिकाला आधार

**डिजिटल करूणेची प्रत्यक्ष कृती** 21
डिजिटल प्रशासनाला मानवतेचा स्पर्श: लातूरमध्ये वृद्ध दाम्पत्याला मिळाला सन्मानाने हक्काचा लाभ...

**डिजिटल परिवर्तन** 23
अडथळ्यांवर मात
कळवणचे अमोल खैरनार यांच्या जिद्दीचा प्रवास

**डिजिटल समावेशन** 25
ग्रामस्थांच्या गरजांना अनुकूल डिजिटल परिवर्तन: नाशिकचे राहुल बरकले यांची प्रेरणादायी यशोगाथा

**आपले सरकार सेवा केंद्र चालकांच्या यशोगाथा** 27
सेवेतून मिळाली प्रतिष्ठा: ननाशी’चे अजीज शेख यांची नागरिकाभिमुख यशोगाथा

**क्षमता विकास** 29
डिजिटल प्रशासनाचे अग्रदूत



# संपादकीय


## भगवान पाटील

मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी


## महाडीबीटी 2.0 : डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून कल्याणकारी व्यवस्थेत परिवर्तन

डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावते, तेव्हाच ते अर्थपूर्ण ठरते. आज नागरिकांना प्रदान केल्या जाणाऱ्या सेवांच्या निव्वळ संख्येवरून प्रशासकीय यशाचे मोजमाप केले जात नाही, तर त्या सेवा प्रत्येक लाभार्थींपर्यंत किती कार्यक्षमतेने, पारदर्शकपणे आणि सर्वसमावेशकपणे पोहोचतात, यावरून सुद्धा या सेवांचे मूल्यमापन केले जाते. या पार्श्वभूमीवर 'महाडीबीटी 2.0' प्रकल्पाचे लोकार्पण हा महाराष्ट्रासाठी 'नागरिकाभिमुख' आणि 'तंत्रज्ञान-सक्षम' प्रशासन व्यवस्था उभारण्याच्या प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

सार्वजनिक सेवा वितरण व्यवस्था बळकट करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या बाबतीत मागच्या दशकात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. 'थेट लाभ हस्तांतरण' प्रणालीद्वारे कशा प्रकारे गळती रोखता येते, पारदर्शकता वाढवता येते आणि सरकारी मदत थेट व कार्यक्षमतेने अपेक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवता येते, हे महाडीबीटी मंचाने दाखवून दिले आहे. याच भक्कम पायावर आधारित महाडीबीटी 2.0 हा प्रकल्प केवळ एका अद्ययावत पोर्टलपुरता मर्यादित नसून, कल्याणकारी प्रशासन व्यवस्थेच्या संपूर्ण पुनर्निर्मितीच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

शासन प्रक्रिया पुनर्रचनेवर दिलेला भर, हे महाडीबीटी 2.0 चे वैशिष्ट्य होय. यामध्ये विद्यमान प्रक्रियांचे डिजिटायझेशन करण्याबरोबरच जास्त कार्यक्षमता आणि सुलभ वापरासाठी या प्रक्रियांची पुनर्रचना करण्याकरिता सुद्धा तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. महा वन लॉगिन, इंटेलिजेंट डॉक्युमेंट आणि डेटा फेचिंग, महासारथी इंटिग्रेशन, एआय-सक्षम नागरिक सेवा, प्रमाणित कार्यप्रवाह, रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि स्वयंचलित मंजुरी अशी वैशिष्ट्ये, नागरिक आणि शासकीय विभाग या दोन्ही भागधारकांना एक विशेष आणि सकारात्मक अनुभव प्रदान करतात. किमान कागदपत्रांचा वापर करून, प्रक्रिया सुलभ करून आणि सेवा वितरणाला गती देऊन, हा मंच शासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास दृढ करतो.

तंत्रज्ञानाच्या पलीकडे जाऊन विचार केला तर महाडीबीटी 2.0 हे सर्वसमावेशक आणि जबाबदार शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे. विविध विभागांमधील शेकडो कल्याणकारी योजनांचा समावेश करण्यासाठी या मंचाचा विस्तार होत जाईल, तसतसा हा मंच एक एकीकृत डिजिटल प्रवेशद्वार म्हणून काम करू लागेल. एक असा मंच, ज्याद्वारे नागरिक अधिक सोयीस्कररित्या, पारदर्शकपणे आणि आत्मविश्वासाने शासकीय लाभ प्राप्त करू शकतील. त्याचबरोबर हा प्रकल्प धोरणकर्त्यांना अंमलबजावणीचे वास्तविक चित्र प्रदान करतो, ज्यामुळे माहितीपूर्ण निर्णय घेणे आणि कार्यक्रमांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होते.

डिजिटल नवोपक्रमांच्या आघाडीवर महाराष्ट्र देश-पातळीवर आगेकूच करत असताना, तंत्रज्ञान कशा प्रकारे सामाजिक सक्षमीकरणाचे एक प्रभावी साधन ठरू शकते, हे महाडीबीटी 2.0 या प्रकल्पाने दाखवून दिले आहे. प्रत्येक पात्र नागरिकाला कल्याणकारी योजनांचे लाभ कार्यक्षमतेने, सुरक्षितपणे आणि सन्मानाने मिळवून देण्याच्या शासनाच्या वचनबद्धतेशी सुसंगत कार्य करणारा हा मंच आहे. डिजिटल परिवर्तनाच्या नव्या युगात महाराष्ट्र प्रवेश करत असताना 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' अधिक मजबूत करण्यात आणि कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचे नवीन मापदंड प्रस्थापित करण्यात महाडीबीटी 2.0 हा प्रकल्प महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. हा मंच नवनवीन तंत्रज्ञान, बदलते धोरणात्मक प्राधान्यक्रम आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षांशी सहजपणे जुळवून घेऊ शकेल, हे, या मंचाच्या विस्तारक्षम आणि भविष्यातील गरजांसाठी सज्ज रचनेवरून दिसून येते. महाडीबीटी 2.0 या प्रकल्पाने नागरिकांना नवोपक्रमांच्या केंद्रस्थानी ठेवून केवळ शासकीय सेवांच्या वितरणाची पद्धतच बदलली नाही तर आणखी उज्ज्वल आणि समन्यायी भविष्यासाठी सर्वसमावेशक, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन असलेल्या महाराष्ट्राच्या संकल्पनेलाही बळ दिले आहे.



# मुख्य लेख: महाडीबीटी 2.0


## समीर सुभाष पाटील
प्रकल्प व्यवस्थापक


## बुद्धिमान डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून थेट लाभ हस्तांतरण व्यवस्थेची फेररचना

डिजिटल प्रशासनाचे खरे यश, ऑनलाईन उपलब्ध असणाऱ्या सेवांच्या संख्येवर नाही, तर नागरिकांना त्या सेवांचा किती सहज, सुलभ आणि विश्वासार्हपणे लाभ घेता येतो, यावर अवलंबून असते.'

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत योग्य वेळी, पूर्ण पारदर्शकतेने आणि जबाबदारीने पोहोचवणे, हे कोणत्याही शासनव्यवस्थेचे अंतिम ध्येय असते. महाराष्ट्रासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या राज्यात लाखो विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, उद्योजक, आदिवासी समाज तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शेकडो कल्याणकारी योजना राबवल्या जातात. या योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केवळ कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा पुरेशी नसते तर बुद्धिमान, सक्षम आणि नागरिकाभिमुख डिजिटल परिसंस्था आवश्यक असते.

मागच्या दशकभरात भारतातील डिजिटल प्रशासनाच्या वाटचालीत महाराष्ट्राने सातत्याने अग्रणी भूमिका बजावली आहे. ई-प्रशासनाच्या विविध उपक्रमांपासून ते नागरिकांसाठी एकात्मिक डिजिटल सेवा व्यासपीठांच्या निर्मितीपर्यंत, सर्वसमावेशक विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून महाराष्ट्राने तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे.

याच परिवर्तनशील उपक्रमांमध्ये महाराष्ट्र थेट लाभ हस्तांतरण अर्थात महाडीबीटी हे पोर्टल राज्यातील सर्वात प्रभावी डिजिटल सार्वजनिक सेवा मंच म्हणून उदयास आले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून शासकीय योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो. त्यामुळे प्रक्रियेतील गळती, अनावश्यक विलंब आणि मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, लाभ वितरण अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह झाले आहे.

आज महाराष्ट्र या यशस्वी प्रवासात आगेकूच करतो आहे. महाडीबीटी 2.0 या अत्याधुनिक डिजिटल मंचाच्या माध्यमातून राज्य शासनाने लाभ वितरणाची प्रणाली अधिक सक्षम केलेली असून, कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची संपूर्ण रचनादेखील नव्याने उभी केली आहे.

महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) यांच्या अंमलबजावणीत विकसित करण्यात आलेले महाडीबीटी 2.0 हे विद्यमान पोर्टलचे अद्ययावत रूप आहे, असे प्रथमदर्शी वाटत असले तरी महाडीबीटी 2.0 हे पोर्टल म्हणजे शासन प्रक्रिया पुनर्रचना (गव्हर्नन्स प्रोसेस रीइंजिनिअरिंग), बुद्धिमान स्वयंचलित प्रणाली, एकात्मिक डिजिटल पायाभूत सुविधा आणि नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकसित केलेली सेवा वितरण व्यवस्था यांचा समन्वय साधणारा एक व्यापक प्रशासकीय परिवर्तन उपक्रम आहे.

पारदर्शकता, कार्यक्षमता, परस्परसंवादक्षमता आणि विस्तारक्षमतेच्या तत्त्वांवर उभारण्यात आलेले महाडीबीटी 2.0 हे महाराष्ट्राच्या व्यापक डिजिटल दृष्टीकोनाचे प्रतिनिधित्व करते, जो नागरिकांना एकाच मंचावरून विविध शासकीय योजनांचा सहज लाभ प्रदान करतो, तसेच त्यामुळे शासकीय विभागांना प्रमाणित कार्यपद्धती, वास्तविक विश्लेषण आणि बुद्धिमान निर्णय सहाय्य प्रणालींचा लाभ मिळतो.



## महाराष्ट्रातील थेट लाभ हस्तांतरण सेवेचा प्रवास

थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर-डीबीटी) प्रणालीने शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या वितरणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये आर्थिक सहाय्य थेट जमा केल्यामुळे मध्यस्थांची गरज कमी झाली, आर्थिक गळती आणि गैरव्यवहारांना आळा बसला,

पारदर्शकता वाढली आणि सार्वजनिक निधीचा वापर जास्त परिणामकारक झाला.

डीबीटी व्यवस्थेची परिवर्तन-क्षमता ओळखून महाराष्ट्र शासनाने विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांचे एकत्रित डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी महाडीबीटी पोर्टल विकसित केले. कालांतराने हा मंच देशातील सर्वात मोठ्या राज्यस्तरीय डीबीटी परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित झाला.

सुरुवातीच्या काळात या पोर्टलचा वापर प्रामुख्याने शिष्यवृत्ती योजनांसाठी करण्यात आला. त्यानंतर या पोर्टलमध्ये कृषी, आदिवासी विकास, वनविकास तसेच इतर अनेक नागरिकाभिमुख योजनांचा समावेश टप्प्याटप्प्याने करण्यात आला. विविध विभागांचा सहभाग वाढत गेला, आणि महाडीबीटी राज्याच्या कल्याणकारी योजनांच्या वितरणासाठी अत्यावश्यक डिजिटल पायाभूत व्यवस्था बनली.

आज या मंचावर विविध शासकीय विभागांच्या अनेक योजना कार्यरत आहेत. सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) आणि आधार सक्षम पेमेंट प्रणाली (एईपीएस) यांसारख्या सुरक्षित डिजिटल पेमेंट यंत्रणांच्या माध्यमातून 1.5 कोटींपेक्षा जास्त लाभार्थ्यांच्या खात्यात तब्बल 21 हजार 655 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी थेट जमा करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी राज्यातील आर्थिक समावेशनाला चालना देणारी, प्रशासन अधिक सक्षम करणारी आणि शासकीय लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत जलद, सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने पोहोचवणारी ठरली आहे.



**धीरेंद्र प्रताप सिंह**

*प्रकल्प प्रमुख, महाआयटी*

## महाडीबीटी 1.0 : मजबूत डिजिटल पायाभूत व्यवस्थेची यशस्वी उभारणी

महाडीबीटी 2.0 च्या पुढच्या प्रवासाविषयी जाणून घेण्यापूर्वी, महाराष्ट्राच्या कल्याणकारी डिजिटल परिसंस्थेचा मजबूत पाया रचणाऱ्या महाडीबीटी 1.0 च्या उल्लेखनीय यशाची दखल घेणे आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षांत महाडीबीटी 1.0 ने तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून सार्वजनिक सेवा वितरणामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणता येतो, हे सिद्ध करून दाखवले आहे.

शिक्षण आणि कृषीपुरतेच महाडीबीटीचे कार्य मर्यादित राहिलेले नाही. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेतर्गत सौर कुंपण (सोलार फेन्सिंग) सुविधा तसेच सरल (वाटप नोंदणीसाठी सुलभ अर्ज) शिक्षण पोर्टलशी एकत्रिकरण करण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसारख्या विविध अभिनव उपक्रमांचाही महाडीबीटीमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे डिजिटल प्रशासनाची व्याप्ती समाजाच्या विविध घटकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचली आहे.

या सर्व यशस्वी उपक्रमांमुळे महाडीबीटी 1.0 ने डिजिटल प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास दृढ केला. लाभार्थ्यांची अचूक ओळख, प्रक्रियेतील पुनरावृत्ती कमी करणे, पारदर्शकता वाढवणे आणि शासकीय लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवणे या सर्वच आघाड्यांवर या मंचाने उल्लेखनीय यश मिळवले आहे.

## महाडीबीटी 2.0 ची गरज का निर्माण झाली?

महाडीबीटी 1.0 ने उल्लेखनीय यश मिळवले असले तरी कालांतराने विविध जन-कल्याणकारी योजनांचा विस्तार होत गेला आणि त्यासोबत अनेक नवीन प्रशासकीय गुंतागुंतीही निर्माण होत गेल्या.

अधिकाधिक शासकीय विभागांनी डिजिटल सेवा वितरणाचा स्वीकार केला. नवीन योजना सुरू होत गेल्या. मात्र प्रत्येक विभागाने आपल्या गरजेनुसार स्वतंत्र अर्ज नमुने, मंजुरीच्या प्रक्रिया, पात्रतेचे निकष आणि पडताळणी पद्धती विकसित केल्या.

परिणामी, संपूर्ण डिजिटल व्यवस्था अनेक स्वतंत्र प्रक्रियांमध्ये विभागली गेली.

नागरिकांना वेगवेगळ्या योजनांसाठी स्वतंत्र अर्ज करावे लागत होते, तीच कागदपत्रे वारंवार अपलोड करावी लागत होती आणि प्रत्येक वेळी दीर्घ पडताळणी प्रक्रियेला सामोरे जावे लागत होते.

दुसरीकडे, शासकीय विभागांनाही प्रत्येक योजनेसाठी वेगवेगळ्या कार्यप्रवाहांचे व्यवस्थापन करावे लागत होते. अर्जांची वारंवार छाननी, त्याच माहितीची वारंवार पडताळणी आणि अनेक टप्प्यांवरील मानवी हस्तक्षेपामुळे वेळ, मनुष्यबळ आणि स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत होता.

विविध विभागांच्या स्वतंत्र कार्यपद्धतींमुळे तांत्रिक प्रणालींचे प्रमाणिकीकरण करणेही आव्हानात्मक ठरत होते. परिणामी, नवीन

योजना महाडीबीटीवर समाविष्ट करण्यासाठी अधिक वेळ लागत होता आणि प्रणालीच्या अंमलबजावणीची प्रक्रिया जास्त गुंतागुंतीची होत होती.

याशिवाय, आधार संलग्नीकरण (आधार सीडींग), सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) समाकलन, योजनानिहाय बँक खाते निश्चिती (स्कीम स्पेसिफिक अकाऊंट मॅपिंग) तसेच प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कार्यप्रवाह सानुकूलित करण्यासारख्या अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय आव्हानांमुळे अधिक लवचिक, एकात्मिक आणि भविष्यातील गरजा पूर्ण करणाऱ्या डिजिटल मंचाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवू लागली.

या सर्व बाबींचा सखोल विचार करून महाराष्ट्र शासनाने केवळ विद्यमान प्रणालीमध्ये टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्याऐवजी थेट लाभ हस्तांतरणाच्या (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) संपूर्ण परिसंस्थेची नव्याने रचना करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या सर्व डीबीटी योजनांचा लाभ एकाच मंचावर विविध योजनांचा लाभ घेता येईल, असा एकच बुद्धिमान, एकात्मिक आणि सर्वसमावेशक डिजिटल मंच विकसित करणे हा यामागचा उद्देश होता. त्याचबरोबर पात्र लाभार्थ्यांची अचूक ओळख पटवणे, पुनरावृत्ती टाळणे, फसव्या दाव्यांना आळा घालणे आणि सार्वजनिक निधीचा अधिक कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे, हीदेखील या परिवर्तनाची उद्दिष्टे होती.

ही संकल्पना महाराष्ट्र शासनाच्या मा. मुख्य सचिवांच्या मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत होती, ज्यामध्ये सर्व शासकीय विभागांनी त्यांच्या आर्थिक लाभाच्या योजना महाडीबीटी मंचावर आणाव्यात आणि कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी समान डिजिटल चौकट स्वीकारावी, असे निर्देश देण्यात आले होते.
याच व्यापक आणि दूरदर्शी विचारातून महाडीबीटी 2.0 ची निर्मिती झाली.

नवी आवृत्ती हे केवळ विद्यमान पोर्टलचे अद्ययावत रूप नाही, तर डिजिटल युगात शासनाच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी कशी असावी, याची व्यापक आणि दूरदर्शी पुनर्कल्पना आहे.

## शासन प्रक्रिया पुनर्रचना (गव्हर्नन्स प्रोसेस रीइंजिनिअरिंग) : नागरिककेंद्रित कल्याणकारी परिसंस्थेची उभारणी

कोणत्याही डिजिटल प्रशासन उपक्रमाचे यश वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावरच अवलंबून नसते, तर त्या तंत्रज्ञानाद्वारे सुलभ करण्यात येणाऱ्या प्रशासकीय प्रक्रियांच्या कार्यक्षमतेवरही अवलंबून असते. नव्या स्वरूपात महाडीबीटी 2.0 मध्ये दस्तऐवजांवर आधारित प्रक्रियांना ऑनलाईन स्वरूप देऊन डिजिटल परिवर्तन आणलेले नाही, तर शासकीय कार्यपद्धतींचाच पुनर्विचार केला आहे, अनावश्यक टप्पे दूर केलेले आहेत, प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुलभ केल्या आहेत आणि सेवांची रचना नागरिकांच्या गरजांना अनुरूप अशी केली आहे. याच बाबी महाडीबीटी 2.0 च्या केंद्रस्थानी आहेत.

महाडीबीटी 2.0 हे रूढ अर्थाने केवळ सॉफ्टवेअरचे अद्ययावत रूप नाही, तर शासन प्रक्रिया पुनर्रचनेवर आधारित असणारा हा एक व्यापक प्रशासकीय परिवर्तनाचा कार्यक्रम आहे.

नवीन मंच विकसित करण्यापूर्वी महाआयटीने विविध शासकीय विभागांमधील विद्यमान कार्यप्रवाहांचा सखोल अभ्यास केला. नागरिक नोंदणी, अर्ज सादर करणे, कागदपत्रांची पडताळणी, विभागीय छाननी, मंजुरी आणि निधी वितरण या लाभ वितरण प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे बारकाईने विश्लेषण केले.

कार्यपद्धतीतील त्रुटी ओळखणे, अनावश्यक प्रक्रिया दूर करणे, विभागांमध्ये समान कार्यपद्धती विकसित करणे आणि कोणत्याही प्रकारच्या कल्याणकारी योजनेसाठी स्वीकारता येईल अशी कसमान डिजिटल चौकट तयार करणे, हे या अभ्यासामागील उद्दिष्ट होते. या अभ्यासाच्या आधारे नागरिक आणि शासकीय अधिकारी या दोघांच्याही वेळेची आणि श्रमांची मोठ्या प्रमाणावर बचत करणारी कार्यक्षम प्रणाली तयार करणे अपेक्षित होते.

नव्या प्रणालीमध्ये नागरिकांना अर्ज भरणे आणि दस्तऐवज अपलोड करण्यासाठी कमी वेळ लागतो, त्याबरोबर शासकीय विभागांना प्रमाणित कार्यप्रवाह, स्वयंचलित पडताळणी, जलद मंजुरी प्रक्रिया आणि कमी प्रशासकीय भाराचा लाभ मिळतो. अशा प्रकारे शासन प्रक्रिया पुनर्रचना ही महाडीबीटी 2.0 च्या जलद, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख कल्याणकारी व्यवस्थेचा भक्कम पाया ठरते.

## शासकीय कार्यप्रवाहांचे प्रमाणिकरण

विविध शासकीय विभागांच्या कार्यपद्धतीतील विविधता हे महाडीबीटी 1.0 समोर उभे राहिलेले सर्वांत मोठे आव्हान होते.

प्रत्येक विभागाचे अर्ज नमुने, मंजुरीची साखळी, छाननीची पद्धत आणि प्रशासकीय प्रक्रिया वेगवेगळी होती. परिणामी, प्रत्येक नवीन योजनेसाठी सॉफ्टवेअरची रचना जवळपास नव्याने करावी लागत असे. त्यामुळे नवीन योजना विकसित करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि प्रणालीची देखभाल यासाठी जास्त वेळ आणि स्रोतांची आवश्यकता भासत होती.

महाडीबीटी 2.0 ने या आव्हानावर प्रभावी उपाय म्हणून प्रमाणित व्यावसायिक कार्यप्रवाह (स्टँडर्डाइज्ड बिझनेस प्रोसेसेस) विकसित केले आहेत.

नव्या चौकटीमुळे सर्व विभागांसाठी समान प्रशासन व्यवस्था उपलब्ध होते. त्याचवेळी प्रत्येक विभागाच्या गरजांनुसार आवश्यक लवचिकताही कायम ठेवण्यात आली आहे.

आता विभागांना सॉफ्टवेअरमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल न करता कार्यप्रवाह, पात्रतेचे निकष आणि मंजुरी प्रक्रिया स्वतःच्या गरजेनुसार सानुकूलित करता येतात. त्यामुळे महाडीबीटी मंचावर नवीन योजना जास्त जलद, सुलभ आणि कार्यक्षम पद्धतीने समाविष्ट करता येतात. या प्रमाणिकरणामुळे अंमलबजावणीचा खर्च कमी होईल, विविध विभागांच्या कार्यपद्धतीतील सुसंगतता वाढेल आणि भविष्यातील कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अधिक वेगाने करता येईल.

## महासारथी : डिजिटल बुद्धिमत्तेचा एकात्मिक स्तर

महासारथी हा महाराष्ट्र शासनाचा एकात्मिक डिजिटल सेवा मंच, महाडीबीटी 2.0 च्या केंद्रस्थानी आहे. विविध शासकीय माहिती प्रणाली आणि नागरिक सेवांना परस्पर जोडणारा बुद्धिमान एकात्मिक स्तर (इंटेलिजंट इंटिग्रेशन लेयर) म्हणून महासारथी कार्य करते.

महाडीबीटी 2.0 हे स्वतंत्रपणे कार्य करणारे पोर्टल नसून, महासारथीच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांतील माहिती-प्रणालींना सुरक्षितपणे परस्परांशी जोडणारी डिजिटल परिसंस्था आहे. या एकात्मिक व्यवस्थेमुळे नागरिकांची नोंद, डिजिटल कागदपत्रे आणि विविध शासकीय सेवांशी संबंधित माहिती आवश्यकतेनुसार वास्तविक वेळी सुरक्षितपणे प्राप्त करता येते. त्यामुळे वारंवार तीच माहिती भरण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर कमी होते.

आता नागरिकांना शासनाकडे आधीपासून उपलब्ध असलेले दस्तऐवज वारंवार सादर करण्याची गरज नाही. अर्जदाराच्या संमतीनंतर संबंधित माहिती विश्वसनीय शासकीय डिजिटल संग्रहातून सुरक्षितपणे प्राप्त केली जाते. त्यामुळे नागरिकांची सोय होते आणि माहितीची विश्वासार्हताही सुनिश्चित होते.

दस्तऐवजांच्या आधारे पडताळणी करण्याऐवजी थेट प्रमाणित डिजिटल माहितीच्या आधारे पडताळणी करण्याकडे झालेला हा बदल महाराष्ट्राच्या कागदरहित डिजिटल प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## महा वन लॉगिन : एक नागरिक, एकच डिजिटल ओळख

महाडीबीटी 2.0 मधील सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे महा वन लॉगिन ही एकात्मिक सिंगल साइन-ऑन (एसएसओ) प्रणाली.

यापूर्वी विविध शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना प्रत्येक पोर्टलवर स्वतंत्र नोंदणी करावी लागत असे. प्रत्येक सेवेसाठी स्वतंत्र युजरनेम, पासवर्ड आणि प्रमाणीकरण प्रक्रिया असल्याने नागरिकांना ते गैरसोयीचे वाटत होते.

महा वन लॉगिन या संकल्पनेमुळे ही गुंतागुंत पूर्णपणे दूर होते. सुरक्षित डिजिटल ओळख प्रमाणित केल्यानंतर नागरिकांना एकाच लॉगिनच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ सहजपणे घेता येतो. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या मंचांवर लॉगिन करण्याची आवश्यकता राहत नाही. त्यामुळे शासनाच्या विविध विभागांमध्ये नागरिकांना अधिक सुसंगत, सुलभ आणि अखंड डिजिटल अनुभव मिळतो.

या मंचामुळे नागरिकांची सोय होते, आणि मध्यवर्ती प्रमाणीकरण प्रणालीमुळे सायबर सुरक्षिततेलाही अधिक बळकटी मिळते. समान ओळख पडताळणी मानके लागू केल्यामुळे अनेक स्वतंत्र वापरकर्ता खात्यांमुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षाविषयक जोखमीही लक्षणीयरीत्या कमी होतात.

## बुद्धिमान माहिती प्राप्ती प्रणाली : पुनरावृत्तीला पूर्णविराम

शासकीय योजनांसाठी अर्ज करताना नागरिकांना वारंवार त्याच वैयक्तिक माहितीची नोंद करावी लागणे आणि तेच दस्तऐवज वारंवार अपलोड करावे लागणे, ही दीर्घकाळापासूनची समस्या होती.

बुद्धिमान डेटा एकत्रीकरणाच्या (इंटेलिजंट इंटिग्रेशन लेयर) माध्यमातून महाडीबीटी 2.0 या समस्येवर प्रभावी उपाय उपलब्ध करून देते.

अर्जदाराच्या संमतीनंतर विविध प्रमाणित शासकीय डेटाबेसमधील उपलब्ध माहिती सुरक्षितपणे प्राप्त केली जाते. त्यामुळे अर्जातील अनेक माहितीचे रकाने स्वयंचलितपणे भरले जातात आणि अर्जदाराला ती माहिती पुन्हा नोंदवावी लागत नाही.

या बुद्धिमान प्रणालीमुळे अर्ज भरण्यासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होतो. हाताने माहिती भरताना होणाऱ्या चुका टळतात आणि माहितीची अचूकता वाढते.

त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे शासकीय विभागांना आवश्यक माहिती थेट अधिकृत आणि विश्वासार्ह स्रोतांमधून पडताळता येते. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनते.

## कागदरहित प्रशासनाकडे निर्णायक वाटचाल

पारंपरिक शासकीय व्यवस्थेत दस्तऐवजांवर आधारित प्रक्रिया ही लाभ वितरणातील विलंबाचे मुख्य कारण ठरत होती. विविध प्रमाणपत्रांच्या छायाप्रती, वारंवार पडताळणी आणि भौतिक अभिलेखांचे व्यवस्थापन यासाठी मोठ्या प्रमाणावर वेळ, मनुष्यबळ आणि प्रशासकीय स्रोत खर्च होत असत. त्याचबरोबर नागरिकांनाही अनावश्यक त्रास सहन करावा लागत असे.

महाडीबीटी 2.0 मध्ये सुरक्षित डिजिटल दस्तऐवज प्राप्त होतात, आणि

एकात्मिक पडताळणी व्यवस्थेच्या माध्यमातून कागदी प्रक्रियेवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होते.

आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र किंवा शैक्षणिक कागदपत्रे यांसारखे दस्तऐवज वारंवार अपलोड करण्याऐवजी, ते संबंधित शासकीय डिजिटल स्रोतांमधून उपलब्ध झाल्यास अधिक विश्वासार्ह ठरतात.

यामुळे नागरिकांचा दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी लागणारा वेळ आणि त्रास कमी होतो. त्याचवेळी शासकीय अधिकाऱ्यांनाही दस्तऐवजांची स्वतंत्र पडताळणी करण्यासाठी कमी वेळ द्यावा लागतो. ही प्रणाली म्हणजे पर्यावरणपूरक, कागदरहित आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम प्रशासनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## सिंगल क्लिक नूतनीकरण : लाभाची सातत्यपूर्ण सुलभता

अनेक शासकीय योजनांसाठी लाभार्थ्यांना दरवर्षी नूतनीकरण अर्ज सादर करावा लागतो. पारंपरिक व्यवस्थेत, अर्जदाराच्या तपशिलात कोणताही बदल नसतानाही संपूर्ण अर्ज प्रक्रिया पुन्हा करावी लागत असे.

महाडीबीटी 2.0 मध्ये सिंगल क्लिक नूतनीकरण ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सुविधेमुळे पात्र लाभार्थी अत्यंत सुलभ डिजिटल प्रक्रियेद्वारे आपल्या अर्जाचे नूतनीकरण करू शकतात. पूर्वी पडताळणी झालेली माहिती, आधीच सादर केलेली कागदपत्रे आणि प्रमाणित डिजिटल नोंदी आवश्यकतेनुसार पुन्हा वापरता येतात.

परिणामी, नूतनीकरणासाठी लागणारा वेळ आणि दस्तऐवजांची पुनरावृत्ती मोठ्या प्रमाणात कमी होतात. विशेषतः शिष्यवृत्ती योजना, वार्षिक आर्थिक सहाय्य योजना आणि नियमित नूतनीकरण आवश्यक असलेल्या इतर कल्याणकारी योजनांच्या बाबतीत ही सुविधा लाखो लाभार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता : नागरिक सेवांचा पुढील टप्पा

महाडीबीटी 2.0 चे आणखी एक दूरदर्शी वैशिष्ट्य म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित नागरिक सेवांचा समावेश करण्याची सज्जता.

अर्जदारांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत, विशेषतः मराठी आणि इंग्रजीमध्ये, प्रणालीशी संवाद साधता येईल, अशी बुद्धिमान प्रणाली विकसित करून भविष्यात या मंचावर उपलब्ध करून दिली जाणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असणारी ही प्रणाली नागरिकांना अर्ज प्रक्रिया समजावून सांगू शकेल, वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल, अर्ज भरताना आवश्यक मार्गदर्शन करू शकेल आणि डिजिटल सेवांचा कमी अनुभव असलेल्या नागरिकांनाही आत्मविश्वासाने सेवा वापरण्यास मदत करेल.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान अधिक सक्षम होत गेल्यानंतर, अशा सुविधा नागरिकांसाठी सेवा अधिक सर्वसमावेशक, सुलभ आणि परिणामकारक बनवतील. त्याचबरोबर सहाय्यता कक्षावरील कामाचा भारही मोठ्या प्रमाणात कमी होईल.

## मॉड्युलर तंत्रज्ञानामुळे नवीन योजनांचा जलद समावेश

समाजाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन शासनाच्या कल्याणकारी योजनांमध्ये सातत्याने बदल होत असतात आणि नवीन योजना सुरु होतात. म्हणूनच आधुनिक डिजिटल मंचावर नवीन योजना समाविष्ट करण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्याची गरज वारंवार भासू नये, या दृष्टीने महाडीबीटी 2.0 ची रचना मॉड्युलर आर्किटेक्चरवर करण्यात आली आहे.

प्रमाणित एपीआय (स्टँडर्डाइज्ड एपीआयज्), एकात्मिक नोंदणी प्रणाली (इंटिग्रेटेड रजिस्ट्रिज) आणि सानुकूलित व्यावसायिक नियम (कन्फिगरेबल बिझनेस रुल्स) यांच्या साहाय्याने नवीन योजना अत्यंत वेगाने या मंचावर समाविष्ट करता येतात.

विभागांना नवीन कल्याणकारी योजना सुरु करणे, पात्रतेचे निकष बदलणे किंवा कार्यप्रवाहात आवश्यक सुधारणा करणे पूर्वीपेक्षा अधिक वेगाने आणि सुलभतेने शक्य होत आहे.

भविष्यात शासनाच्या धोरणांमध्ये, तंत्रज्ञानामध्ये किंवा नागरिकांच्या अपेक्षांमध्ये होणाऱ्या बदलांनुसार महाडीबीटी 2.0 सातत्याने विकसित होत राहील, अशी सक्षम आणि भविष्याभिमुख रचना या मंचाद्वारे उभारण्यात आली आहे.

## नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकसित केलेला मंच

महाडीबीटी 2.0 मधील प्रत्येक नावीन्यपूर्ण वैशिष्ट्यामागे एकच मूलभूत विचार आहे, तो म्हणजे शासकीय सेवांशी जुळवून घेण्याची जबाबदारी नागरिकांवर नसून, शासनाच्या सेवाच नागरिकांच्या गरजांनुसार बदलल्या पाहिजेत.

एकात्मिक डिजिटल ओळख, बुद्धिमान माहिती प्राप्ती, स्वयंचलित कार्यप्रवाह, बहुभाषिक सेवा, सुलभ नूतनीकरण प्रक्रिया आणि प्रमाणित प्रशासकीय व्यवस्था यांच्या साहाय्याने महाडीबीटी 2.0 नागरिकांचा संपूर्ण अनुभव नव्याने घडवते.

आता नागरिकांना विविध विभागांच्या स्वतंत्र प्रणालींमध्ये वारंवार

प्रवेश करण्याची आवश्यकता उरत नाही. त्याऐवजी एकाच एकात्मिक डिजिटल मंचावरून विविध शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभ, जलद, आणि पारदर्शक पद्धतीने घेता येतो.

याच मंचामुळे शासकीय विभागांनाही अधिक कार्यक्षम कार्यपद्धती, अचूक माहिती व्यवस्थापन आणि अधिक प्रभावी प्रशासकीय नियंत्रण प्राप्त होते.

नागरिकांचा अनुभव अधिक सुलभ करणे आणि शासनाची कार्यक्षमता अधिक सक्षम करणे, या दोन्ही उद्दिष्टांची एकाच वेळी यशस्वी पूर्तता करणारा उपक्रम म्हणून महाडीबीटी 2.0 भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील एक महत्त्वपूर्ण आणि मैलाचा दगड ठरणारा उपक्रम आहे.



**अमेय सरवणकर**

*प्रकल्प व्यवस्थापक, महाआयटी*

## महाराष्ट्राच्या कल्याणकारी क्रांतीला गती देणारी डिजिटल संरचना

आजच्या काळात शासकीय व्यवस्थेत डिजिटल परिवर्तन हे केवळ सेवा वितरणाचे साधन मानले जात नाही, तर आधुनिक प्रशासनाचा मूलभूत पाया म्हणून त्याकडे पाहिले जाते. मात्र प्रभावी डिजिटल प्रशासनासाठी केवळ ऑनलाईन अर्ज आणि इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण पुरेसे नसते. विविध शासकीय विभागांना परस्पर जोडणारी, नागरिकांची सुरक्षित ओळख पडताळणारी, कार्यप्रवाहांचे स्वयंचलन करणारी, वास्तविक वेळेत निर्णय प्रक्रियेला सक्षम करणारी आणि प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता सुनिश्चित करणारी एकात्मिक डिजिटल परिसंस्था उभारणे अत्यावश्यक ठरते.

याच व्यापक दृष्टीकोनातून महाडीबीटी 2.0 ची रचना करण्यात आली आहे. हा मंच केवळ विविध कल्याणकारी योजनांसाठी एकच पोर्टल उपलब्ध करून देत नाही, तर नागरिक, शासकीय विभाग, वित्तीय व्यवस्था आणि तंत्रज्ञान प्रणाली यांना एका एकात्मिक डिजिटल परिसंस्थेत जोडणारी मजबूत डिजिटल संरचना निर्माण करतो.

अर्ज सादर करण्यापासून ते लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा होईपर्यंत प्रत्येक टप्प्याची नव्याने रचना करण्यात आली आहे. या प्रक्रियेत वेग, अचूकता, सुरक्षितता आणि उत्तरदायित्व या चारही बाबींना समान प्राधान्य देण्यात आले आहे.

या एकात्मिक दृष्टिकोनामुळे महाडीबीटी 2.0 हा देशातील सर्वाधिक व्यापक आणि सक्षम राज्यस्तरीय थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर डीबीटी) मंचांपैकी एक म्हणून उदयास आला आहे.

## त्रिस्तरीय डिजिटल कार्यप्रवाह : सुसंगत, सुलभ आणि कार्यक्षम व्यवस्था

महाडीबीटी 2.0 ची सर्वात महत्त्वाची ताकद म्हणजे त्याची प्रमाणित त्रिस्तरीय डिजिटल कार्यप्रवाह प्रणाली. या प्रणालीमुळे विविध विभागांमध्ये कार्यपद्धतीची सुसंगतता निर्माण होते, तसेच प्रत्येक योजनेच्या स्वतंत्र गरजांनुसार आवश्यक लवचिकताही कायम ठेवली जाते.

महाडीबीटी 2.0 मध्ये प्रत्येक कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी तीन परस्परसंबंधित टप्प्यांमध्ये विभागण्यात आली आहे.

1. अर्ज
2. प्रक्रिया
3. लाभ वितरण

या त्रिस्तरीय कार्यप्रवाहामुळे नागरिक आणि शासकीय अधिकारी या दोघांसाठीही सुरुवातीपासून शेवटपर्यंत अखंड, सुसंगत आणि कार्यक्षम डिजिटल अनुभव उपलब्ध होतो.

**1. अर्जाचा टप्पा**

या टप्प्यात नागरिक आधार प्रमाणीकरणाच्या माध्यमातून महाडीबीटी पोर्टलवर थेट अर्ज सादर करू शकतात.

ज्या नागरिकांना स्वतः ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही, त्यांच्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र आणि कॉमन सर्व्हिस सेंटर्सच्या माध्यमातून अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला डिजिटल सेवांचा समान आणि सुलभ लाभ मिळतो.

काही विशिष्ट योजनांमध्ये अर्ज करण्याचीही आवश्यकता राहत नाही. अशा प्रकरणी संबंधित शासकीय विभाग विद्यमान अधिकृत नोंदी किंवा सुरक्षित एपीआयद्वारे लाभार्थ्यांची माहिती थेट प्रणालीमध्ये समाविष्ट करू शकतात. त्यामुळे नागरिकांना आधीपासून शासनाकडे उपलब्ध असलेली माहिती पुन्हा सादर करण्याची गरज भासत नाही.

काही विशिष्ट योजनांमध्ये अर्ज करण्याचीही आवश्यकता राहत नाही. अशा वेळी संबंधित शासकीय विभाग विद्यमान अधिकृत नोंदी किंवा सुरक्षित एपीआयद्वारे लाभार्थ्यांची माहिती थेट प्रणालीमध्ये समाविष्ट करू शकतात. त्यामुळे नागरिकांना आधीपासून शासनाकडे उपलब्ध

असलेली माहिती पुन्हा सादर करण्याची गरज भासत नाही.

**2. प्रक्रिया टप्पा**

या टप्प्यात विविध योजनांच्या स्वरूपानुसार अधिक लवचिक आणि बुद्धिमान पडताळणी प्रक्रिया राबविण्यात येते.

योजनेच्या आवश्यकतेनुसार अर्जांची विभागीय अधिकाऱ्यांकडून ऑनलाईन छाननी केली जाऊ शकते. काही ठिकाणी प्रणालीतील नियमानुसार स्वयंचलित पडताळणी केली जाते, तर काही योजनांमध्ये लाभार्थ्यांची माहिती आधीच विश्वसनीय शासकीय डेटाबेसमध्ये प्रमाणित असल्यास थेट मंजुरीची प्रक्रियाही अवलंबता येते.

या बुद्धिमान कार्यपद्धतीमुळे मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात कमी होतो, तसेच पडताळणी प्रक्रियेची विश्वासार्हता आणि अचूकता कायम राहते.

**3. लाभ वितरण टप्पा**

अंतिम टप्प्यात पात्र लाभार्थ्यांपर्यंत आर्थिक सहाय्य जलद, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचवले जाते.

योजनेच्या स्वरूपानुसार निधी थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केला जातो. आवश्यकतेनुसार शैक्षणिक संस्था, विद्यापीठे किंवा शासनाने अधिकृत केलेल्या अंमलबजावणी संस्थांच्या खात्यातही निधी वर्ग करण्यात येऊ शकतो.

या संपूर्ण त्रिस्तरीय डिजिटल कार्यप्रवाहामुळे अर्जापासून लाभ वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक वेगवान, सुसंगत आणि विश्वासार्ह बनते. नागरिकांचा वेळ वाचतो, विभागांची कार्यक्षमता वाढते आणि शासनाचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत अधिक अचूकपणे पोहोचतो.

## नियमाधारित बुद्धिमान स्वयंचलन : अधिक वेगवान आणि अचूक प्रक्रिया

पारंपरिक कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत अर्जांची छाननी मोठ्या प्रमाणावर मानवी हस्तक्षेपावर अवलंबून असे. त्यामुळे प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी अधिक वेळ लागत असे, निर्णयांमध्ये विसंगती निर्माण होण्याची शक्यता असे आणि प्रशासकीय यंत्रणेवर अतिरिक्त कामाचा ताण येत असे.

महाडीबीटी 2.0 या पारंपरिक पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणते. नियमाधारित बुद्धिमान स्वयंचलन (रुल-बेस्ड इंटेलिजंट ऑटोमेशन) या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अर्जांची पडताळणी अधिक वेगवान, अचूक आणि पारदर्शक करण्यात आली आहे.

या प्रणालीमध्ये प्रत्येक योजनेच्या पात्रतेचे निकष डिजिटल स्वरूपात निश्चित करता येतात. अर्ज सादर झाल्यानंतर प्रणाली त्या निकषांच्या आधारे स्वयंचलितपणे अर्जांची पडताळणी करते. ज्या लाभार्थ्यांची माहिती आधीच प्रमाणित शासकीय डेटाबेसमध्ये उपलब्ध आहे, अशा प्रकरणांमध्ये अनेक वेळा स्वतंत्र छाननीची आवश्यकता देखील राहत नाही.

या बुद्धिमान स्वयंचलित प्रक्रियेमुळे अर्ज निकाली काढण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होतो. त्याचबरोबर सर्व अर्जांवर एकसमान निकष लागू होत असल्याने निर्णय प्रक्रियेत सुसंगतता आणि निष्पक्षता सुनिश्चित होते.

परिणामी शासकीय अधिकाऱ्यांचा वेळ नियमित प्रशासकीय कामांमध्ये न गुंतता धोरणात्मक निर्णय, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी वापरता येतो.

## आधार एकत्रीकरण : विश्वास आणि पारदर्शकतेचा मजबूत पाया

कोणत्याही थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीमध्ये लाभार्थ्याची अचूक ओळख निश्चित करणे हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. याच कारणामुळे महाडीबीटी 2.0 च्या डिजिटल संरचनेत आधार प्रमाणीकरणाला (आधार ऑथेन्टिकेशन) मध्यवर्ती स्थान देण्यात आले आहे.

या मंचावर प्रत्येक लाभार्थ्याची ओळख त्याच्या अद्वितीय आधार क्रमांकाच्या आधारे प्रमाणित केली जाते. आर्थिक सहाय्य वितरित करण्यापूर्वी संबंधित लाभार्थ्याचे आधार आणि बँक खाते सुरक्षितपणे संलग्न असल्याची खात्री केली जाते.

या मजबूत ओळख व्यवस्थेमुळे शासकीय लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंतच पोहोचतात. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती, बनावट दावे आणि फसवणुकीच्या शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होतात.

याशिवाय, लाभ वितरणापूर्वी आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणाशी ही प्रणाली पूर्णपणे सुसंगत आहे. त्यामुळे संपूर्ण लाभ वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, विश्वासार्हता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होते.

## सुरळीत आणि सुरक्षित वित्तीय एकत्रीकरण

महाडीबीटी 2.0 ची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील डिजिटल वित्तीय पायाभूत सुविधांशी करण्यात आलेले प्रभावी एकत्रीकरण.

हा मंच सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली तसेच आधार आधारित डिजिटल पेमेंट यंत्रणांशी एकात्मिकपणे कार्य करतो. त्यामुळे निधी हस्तांतरणाची संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि अधिक कार्यक्षम बनते.

या व्यवस्थेमुळे प्रत्येक विभाग आपल्या योजनानिहाय खात्यातून पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी वर्ग करू शकतो. कोणत्याही मध्यस्थाची आवश्यकता नसल्याने निधी वितरणाचा वेग वाढतो, आर्थिक उत्तरदायित्व अधिक मजबूत होते आणि प्रत्येक व्यवहाराचा संपूर्ण डिजिटल मागोवा घेणे शक्य होते.

महाडीबीटी 2.0 मध्ये आधार पेमेंट ब्रिज प्रणालीचाही समावेश करण्यात आला आहे. निधी वितरित करण्यापूर्वी आधार संलग्न बँक खात्यांची पडताळणी केल्यामुळे व्यवहार अपयशी ठरण्याचे प्रमाण कमी होते आणि लाभ वितरणाची विश्वासार्हता अधिक वाढते.

## रिअल-टाइम डॅशबोर्ड : अधिक सक्षम आणि माहिती-आधारित प्रशासन

महाडीबीटी 2.0 मधील सर्वात परिवर्तनकारी वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे त्याची रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि विश्लेषण प्रणाली.

पूर्वीच्या काळी प्रामुख्याने अहवालांवर आधारित शासकीय निर्णय घेतले जात असत. महाडीबीटी 2.0 मुळे आता विविध योजनांच्या अंमलबजावणीवर रिअल-टाइम देखरेख ठेवणे शक्य झाले आहे.

या परस्परसंवादी डॅशबोर्डद्वारे अर्जांची संख्या, मंजुरीची स्थिती, जिल्हानिहाय प्रगती, विभागनिहाय कार्यक्षमता, अर्ज निकाली काढण्याचा कालावधी आणि निधी वितरणाचा वेग अशी महत्त्वाची माहिती तत्काळ उपलब्ध होते.

या विश्लेषणामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना अडथळे वेळीच ओळखणे, आवश्यक त्या ठिकाणी स्रोतांचे प्रभावी नियोजन करणे आणि वेळेवर सुधारात्मक उपाययोजना करणे अधिक सुलभ होते.

पुराव्यांवर आधारित निर्णयप्रक्रियेला चालना देणारी ही प्रणाली शासनाच्या कल्याणकारी योजनांची परिणामकारकता सातत्याने वाढविण्यास मदत करते.

## एसएलए-आधारित प्रशासन : कालबद्ध सेवा आणि उत्तरदायित्व

आजच्या डिजिटल युगात नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ वेळेत मिळणे ही मूलभूत अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महाडीबीटी 2.0 मध्ये सेवा स्तर करार (सर्व्हिस लेव्हल ॲग्रीमेंट - एसएलए) आधारित कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे.

अर्ज प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

या कालमर्यादांचे पालन होत आहे की नाही, यावर शासकीय विभाग सातत्याने देखरेख ठेवू शकतात, त्याचवेळी अर्जदारांनाही त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती अधिक पारदर्शकपणे समजते.

या व्यवस्थेमुळे उत्तरदायित्व वाढते, कार्यक्षमतेचे मोजमाप करता येते आणि विविध विभागांकडून नागरिकांना अधिक जलद व दर्जेदार सेवा प्राप्त होऊ शकतात.

## एकात्मिक तक्रार निवारण व्यवस्था

विविध शासकीय विभागांमध्ये स्वतंत्रपणे विकसित झालेल्या विखुरलेल्या तांत्रिक प्रणालींऐवजी एकात्मिक तंत्रज्ञान परिसंस्था (युनिफाइड टेक्नॉलॉजी स्टॅक) निर्माण करणे, हे महाडीबीटी 2.0 च्या दीर्घकालीन उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

प्रत्येक कल्याणकारी योजनेसाठी स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्याऐवजी, वर्तमान आणि भविष्यातील सर्व योजनांना आधार देणारी एकसमान डिजिटल पायाभूत व्यवस्था उभारण्याची संकल्पना महाडीबीटी 2.0 च्या केंद्रस्थानी आहे.

या व्यासपीठाची मॉड्युलर संरचना, परस्परसंवादक्षम डेटाबेस, प्रमाणित एपीआय आणि सानुकूलित कार्यप्रवाह यांच्या साहाय्याने नवीन योजना अत्यंत कमी वेळेत मंचावर समाविष्ट करता येतात.

यामुळे तांत्रिक विकासाचा खर्च कमी होतो, विविध विभागांमध्ये सुसंगतता राखली जाते आणि महाराष्ट्राच्या वाढत्या कल्याणकारी गरजांना दीर्घकालीन आधार देणारी शाश्वत डिजिटल परिसंस्था निर्माण होते.

## डिजिटल प्रशासनाचा नवा मापदंड

सुयोग्य नियोजन आणि दूरदृष्टीने विकसित केलेले तंत्रज्ञान शासन व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडवून आणू शकते, हे महाडीबीटी 2.0 च्या डिजिटल संरचनेवरून दिसून येते.

आधार प्रमाणीकरण, बुद्धिमान कार्यप्रवाह, स्वयंचलित मंजुरी प्रक्रिया, सुरक्षित वित्तीय व्यवस्था, रिअल-टाइम विश्लेषण, बहुभाषिक सेवा आणि प्रमाणित डिजिटल पायाभूत सुविधा या सर्व घटकांचे प्रभावी एकत्रीकरण करून महाडीबीटी 2.0 ने कार्यक्षम, पारदर्शक आणि भविष्याभिमुख प्रशासनाची नवी चौकट उभारली आहे.

महत्त्वाचे म्हणजे या मंचाने डिजिटल प्रशासनाचा केंद्रबिंदू केवळ प्रशासकीय सुलभतेपुरता मर्यादित ठेवलेला नाही, तर नागरिक सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

पात्र नागरिकांना शासनाचा लाभ वेळेवर, अचूकपणे आणि सन्मानपूर्वक मिळू शकेल, यासाठी प्रत्येक प्रक्रिया अधिक सुलभ, अधिक वेगवान आणि अधिक सहज करण्यावर भर देण्यात आला आहे. या वैशिष्ट्यांमुळे महाडीबीटी 2.0 हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कल्याणकारी योजनांचे आधुनिकीकरण करू इच्छिणाऱ्या देशातील इतर राज्यांसाठीही डिजिटल सार्वजनिक

पायाभूत सुविधांचा (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर) एक आदर्श नमुना ठरतो.

## मानवी स्पर्श असलेले डिजिटल प्रशासन

तंत्रज्ञान स्वतःहून शासन व्यवस्थेत परिवर्तन घडवत नाही. दूरदर्शी धोरणे, परिणामकारक प्रशासकीय प्रक्रिया आणि नागरिकांच्या गरजांची जाण या घटकांसह तंत्रज्ञानाची सांगड घातली जाते, तेव्हाच खऱ्या अर्थाने परिवर्तन घडते.

महाडीबीटी 2.0 ही याच विचारसरणीची प्रभावी अभिव्यक्ती आहे. हा मंच म्हणजे अर्ज स्वीकारणारे किंवा आर्थिक लाभ वितरित करणारे पोर्टल आहे. याखेरीज, विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक सुलभपणे नागरिकांपर्यंत पोहोचवणारी, शासकीय विभागांना बुद्धिमान डिजिटल साधनांनी सक्षम करणारी आणि लाभ वितरणाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता सुनिश्चित करणारी एक सर्वसमावेशक डिजिटल प्रशासन व्यवस्था आहे.
शासन प्रक्रिया पुनर्रचना, महासारथीचे एकत्रीकरण, महा वन लॉगिन, बुद्धिमान स्वयंचलन, रिअल-टाइम विश्लेषण, आधार आधारित पडताळणी आणि नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकसित करण्यात आलेली सेवा व्यवस्था या सर्व घटकांचा प्रभावी संगम महाडीबीटी 2.0 मध्ये पाहायला मिळतो.

यातून महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक सेवा वितरणाच्या भविष्यातील दिशेचा स्पष्ट आणि दूरदर्शी आराखडा साकारला आहे.

डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था घडविण्याच्या महाराष्ट्राच्या वाटचालीत महाडीबीटी 2.0 हा एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरतो. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शासन अधिक प्रतिसादक्षम, अधिक सर्वसमावेशक आणि अधिक परिणामकारक कसे बनू शकते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

महाडीबीटी 2.0 ही केवळ तांत्रिक प्रगतीची नोंद नाही, तर प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाचा लाभ सन्मानाने, पारदर्शकपणे आणि सहजतेने पोहोचविण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या दृढ वचनबद्धतेची पुनर्प्रचिती आहे.

शासन केवळ डिजिटल नसेल, तर अधिक प्रगत, बुद्धिमान, गतिमान, उत्तरदायी आणि खऱ्या अर्थाने नाहरिकाभिमुख असेल, अशा भविष्याची पायाभरणी करणारा हा मंच आहे.

# कौशल्य क्षेत्रातील परिवर्तन




## भविष्यासाठी सज्ज कौशल्यांसाठी TISS-SSE आणि महाआयटी यांच्यात धोरणात्मक भागीदारी

मुंबईत आयोजित 'TechMahaImpacT 2026' परिषदेदरम्यान 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस - स्कूल ऑफ स्किल एज्युकेशन' आणि 'महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित' – महाआयटी यांनी एका महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली, आणि महाराष्ट्राची कौशल्य विकास परिसंस्था बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शासन, शिक्षण क्षेत्र, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. तरुणांसाठी उद्योगांच्या गरजांशी सुसंगत, तंत्रज्ञानावर आधारित आणि सर्वसमावेशक कौशल्य विकास परिसंस्था निर्माण करण्याच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांमधील हा एक नवीन अध्याय आहे.

या करारानुसार 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस - स्कूल ऑफ स्किल एज्युकेशन' आणि महाआयटी संयुक्तपणे अशा कौशल्य विकास कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी करतील, जे वेगाने विकसित होणारी क्षेत्रे आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या गरजांना अनुरूप असतील. शिक्षण आणि उद्योगांच्या अपेक्षा यांमधील तफावत दूर करणे, हा या सहयोगाचा उद्देश आहे. या कराराच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि रोजगार-केंद्रित प्रशिक्षण दिले जाईल, ज्यामुळे शिकणाऱ्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येतील.

या भागीदारीद्वारे नावीन्यतेला चालना देणे, रोजगारक्षमता वाढवणे आणि आजीवन शिक्षणाच्या संधी निर्माण करणे ही उद्दिष्ट्येही निर्धारित करण्यात आली आहेत. तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण पद्धती आणि उद्योगांचा सहभाग यांची सांगड घालून, दोन्ही संस्थांनी भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ तयार करण्याचे ध्येय बाळगले आहे. हे मनुष्यबळ महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात आणि डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात प्रभावी योगदान देण्यास सक्षम असेल.

महाआयटीचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील यांनी या कराराबाबत आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, "ही भागीदारी महाराष्ट्रासाठी, भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शैक्षणिक उत्कृष्टता आणि उद्योग व तंत्रज्ञानातील नैपुण्य यांचा संगम साधून, आम्ही नाविन्यपूर्ण आणि उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्य विकास कार्यक्रम तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यामुळे रोजगारक्षमता वाढेल, उद्योजकतेला चालना मिळेल आणि डिजिटल अर्थव्यवस्थेत यशस्वी होण्यासाठी आवश्यक क्षमतांनी तरुणांचे सक्षमीकरण होईल. हा सहयोग सर्वसमावेशकता आणि शाश्वत विकास साध्य करण्याबरोबरच महाराष्ट्राला कुशल मनुष्यबळ आणि नावीन्यपूर्णतेचे प्रमुख केंद्र बनवण्याच्या आमच्या सामायिक

वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.”

या कराराच्या निमित्ताने 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस - स्कूल ऑफ स्किल एज्युकेशन' आणि महाआयटी यांनी सहयोगात्मक उपक्रम, तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण पद्धती आणि निष्पत्ती-आधारित प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे कौशल्य विकासासाठी एक भक्कम आराखडा तयार करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. हा उपक्रम उच्च-गुणवत्तेचे कौशल्य शिक्षण आणि उद्योगाचा प्रत्यक्ष अनुभव उपलब्ध करून देत, राज्यातील विद्यार्थी, नोकरदार आणि तरुण व्यावसायिक यांच्यासाठी लाभदायक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

प्रस्तावित सहयोगांतर्गत दोन्ही संस्था ग्रामस्तरीय उद्योजक, शासकीय यंत्रणेतील तळागाळातील कर्मचारी आणि डिजिटल सेवा परिचालक यांच्यासाठी 'डिजिटल प्रशासन' प्रशिक्षण आणि क्षमता उभारणी कार्यक्रमांचे आयोजन करतील. या उपक्रमांमुळे सेवांची गुणवत्ता, नागरिकांचा सहभाग आणि तळागाळातील डिजिटल मंचांच्या परिणामकारकतेमध्ये निश्चितच सुधारणा होईल.

या सामंजस्य करारामध्ये प्रत्यक्ष कृतीवर आधारित शैक्षणिक मजकूर, प्रमाणित कार्यपद्धती, सूक्ष्म-शिक्षण मॉड्यूल्स, बहुभाषिक शैक्षणिक साहित्य आणि शिक्षण व्यवस्थापन यंत्रणेसाठी उपयुक्त स्रोत विकसित करण्याची तरतूदही आहे. अशा प्रकारचा मजकूर निरंतर शिक्षणास मदत करेल आणि प्रशासनातील नवीन आव्हानांचा सामना करण्यास सक्षम असे डिजिटलदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ तयार करण्यास सहाय्य करेल.

'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस - स्कूल ऑफ स्किल एज्युकेशन' यांच्या विद्यार्थ्यांसाठी सुनियोजित आंतरवासिता आणि क्षेत्रीय सहभागाच्या संधी निर्माण करणे, हे या सहयोगाचे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. डिजिटल प्रशासन प्रकल्पांच्या प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांना सार्वजनिक सेवा वितरण, तंत्रज्ञान-आधारित प्रशासन आणि समुदाय विकास यांबाबत व्यावहारिक ज्ञान मिळेल. हे उपक्रम शैक्षणिक स्वरूपाचे असतील, आणि रोजगार किंवा आर्थिक दायित्व निर्माण करणार नाहीत.

दोन्ही संस्थांची भागीदारी डिजिटल प्रशासन, डिजिटल समावेशन आणि नागरिक-केंद्रित सेवा वितरणाशी संबंधित उपयोजित संशोधन, प्रकरण अभ्यास, मूल्यमापन आणि दस्तऐवजीकरण यांना प्रोत्साहन देईल. अशा अभ्यासातून समोर येणारे निष्कर्ष धोरणात्मक चर्चेत योगदान देऊ शकतात आणि व्यापक स्तरावर अंमलबजावणीसाठी सर्वोत्तम पद्धती प्रकाशात आणण्यास मदत करू शकतात.

याव्यतिरिक्त, व्यावसायिक, संशोधक, विद्यार्थी आणि शासकीय भागधारक यांच्यात परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही संस्थांतर्फे कार्यशाळा, परिसंवाद, नवनिर्मिती प्रयोगशाळा आणि ज्ञान-आदानप्रदान सत्रे आयोजित केली जातील. उपलब्धतेच्या आणि परस्पर सहमतीच्या माध्यमातून या संस्था वर्गखोल्या, प्रशिक्षण सभागृहे, प्रयोगशाळा, निवास व्यवस्था आणि इतर पायाभूत सुविधांचा बिगर-व्यावसायिक तत्त्वावर संयुक्तपणे वापर करतील.

हे सहकार्य सर्वसमावेशक डिजिटल परिसंस्था उभारण्याच्या आणि भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या भागीदारीमुळे नागरिकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाच्या दिशेने महाराष्ट्राच्या वाटचालीस गती मिळू शकेल.

ही धोरणात्मक भागीदारी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकास, डिजिटल सक्षमीकरण आणि युवा-केंद्रित विकासाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. विविध क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत असताना, आघाडीच्या संस्थांमधले हे सहकार्य शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आणि राज्याचे मानवी भांडवल बळकट करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस - स्कूल ऑफ स्किल एज्युकेशन' आणि महाआयटी या दोन संस्थांमधील हा सामंजस्य करार वेगाने बदलणाऱ्या आजच्या जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान आणि संधींसह भावी पिढीला सक्षम करण्याच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.



# तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी




## डिजिटल प्रशासन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना गती देण्यासाठी महाआयटी आणि सी-डॅक यांच्यात भागीदारी

महाराष्ट्राची डिजिटल प्रशासन परिसंस्था अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित – महाआयटी आणि 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग' – सी-डॅक यांनी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारामुळे उदयोन्मुख तंत्रज्ञान, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि क्षमता उभारणी या क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या संधी शोधणे शक्य होणार आहे. प्रगत संगणन तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यभरात नागरिकाभिमुख प्रशासन आणि सार्वजनिक सेवा वितरणाला बळकटी देण्यासाठी एक धोरणात्मक आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने ही भागीदारी महत्वाची आहे.

सी-डॅक तर्फे सी-डॅक मुंबईचे कार्यकारी संचालक श्री. आदित्य कुमार सिन्हा आणि महाआयटीतर्फे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील यांनी या करारावर अधिकृतपणे स्वाक्षऱ्या केल्या. या समारंभाला सी-डॅक कॉर्पोरेटच्या वैज्ञानिक आणि 'उत्पादने, सेवा आणि पोहोच' प्रमुख डॉ. पद्मजा जोशी, तसेच सी-डॅक मुंबईचे वैज्ञानिक डॉ. कपिल कांत कमल उपस्थित होते.

दोन्ही संस्थांच्या परस्पर सहकार्यामुळे महाआयटीचा ई-प्रशासन उपक्रम राबवण्यातील व्यापक अनुभव आणि सी-डॅकचे प्रगत संगणन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, क्लाउड तंत्रज्ञान, ब्लॉकचेन, बहुभाषिक संगणन आणि डिजिटल नवोपक्रम या क्षेत्रांतील नैपुण्य यांचा संगम होणार आहे. या भागीदारीद्वारे, शासकीय कार्यक्षमता वाढवणारे, नागरिक सेवांमध्ये सुधारणा करणारे आणि महाराष्ट्राला 'डिजिटलदृष्ट्या सक्षम राज्य' बनवण्याच्या दृष्टीकोनाला बळ देणारे नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याचे उद्दिष्ट दोन्ही संस्थांनी बाळगले आहे.

या सामंजस्य करारामध्ये डिजिटल गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म, उदयोन्मुख तंत्रज्ञान, प्रायोगिक प्रकल्प, क्लाउड इकोसिस्टम, परीक्षा आणि प्रमाणीकरण प्रणाली, नागरिक-केंद्रित डिजिटल सेवा आणि इनोव्हेशन सँडबॉक्स अशा अनेक महत्वपूर्ण क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. ही भागीदारी शासकीय अधिकारी आणि तंत्रज्ञान व्यावसायिकांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि ज्ञान-वाटप उपक्रमांच्या माध्यमातून क्षमता उभारणीच्या उपक्रमांवरही लक्ष केंद्रित करेल.

ई-प्रशासन उपक्रम राबवण्याचा महाआयटीचा व्यापक अनुभव आणि सी-डॅकचे प्रगत संगणन, संशोधन व तंत्रज्ञान नवोपक्रमातील कौशल्य एकत्र आणणारा हा करार नाविन्यपूर्ण डिजिटल उपाय विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. हे उपाय सार्वजनिक सेवा वितरण वाढवू शकतील आणि राज्याच्या डिजिटलदृष्ट्या सक्षम महाराष्ट्राच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देतील, अशी अपेक्षा आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत दोन्ही संस्था प्रगत डिजिटल प्रशासन मंच, नागरिक सेवा वितरण प्रणाली आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या विकासाची शक्यता पडताळून पाहतील. शासकीय सेवांची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सुलभता सुधारण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, बिग डेटा ॲनालिटिक्स, सायबर सुरक्षा आणि क्लाउड कंप्युटिंग अशा उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करण्याला हा करार प्राधान्य देईल.

या द्वीपक्षीय सहकार्यामध्ये शासकीय वापरासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे मूल्यांकन करण्याकरिता प्रायोगिक प्रकल्प आणि संकल्पना सिद्धीस नेणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचीही तरतूद आहे. या भागीदारीअंतर्गत वास्तविक प्रशासकीय आव्हानांना

सामोरे जाऊ शकतील आणि नागरिकांचे अनुभव सुधारू शकतील, अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

डिजिटल पायाभूत सुविधांशी संबंधित संधींचा शोध घेणे, हा या भागीदारीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू असून त्यात क्लाउड इकोसिस्टम, डेटा सेंटर्स, आपत्ती निवारण यंत्रणा आणि सुरक्षित तंत्रज्ञान वातावरणाचा समावेश आहे. अशा उपक्रमांमुळे महाराष्ट्राच्या डिजिटल प्लॅटफॉर्मची लवचिकता आणि विश्वसनीयता मजबूत होईल, अशी अपेक्षा आहे.

सुरक्षित आणि कार्यक्षम मूल्यांकन प्रणालींची वाढती गरज लक्षात घेऊन, महाआयटी आणि सी-डॅक ऑनलाइन परीक्षा, उमेदवारांचे प्रमाणीकरण आणि डिजिटल मूल्यांकन प्रक्रियासाठीच्या तांत्रिक उपाययोजनांची पडताळणी करतील. या उपाययोजना सार्वजनिक क्षेत्रातील विविध गरजांसाठी पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित मूल्यांकन आराखड्यांसाठी आधारभूत ठरू शकतील.

या सामंजस्य करारात शासकीय अधिकारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, ज्ञान-आदानप्रदान उपक्रम आणि कौशल्य विकास उपक्रमांद्वारे क्षमता उभारणीवर विशेष भर देण्यात आला आहे. सतत शिकण्याची आणि नाविन्यपूर्णतेची संस्कृती रुजवून, ही भागीदारी सार्वजनिक क्षेत्रात भविष्यासाठी सज्ज क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न करेल, अशा अपेक्षा आहे.

त्याचबरोबर दोन्ही संस्था 'इनोव्हेशन लॅब्स' (नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा), 'गव्हर्नन्स सँडबॉक्सेस' आणि सहयोगात्मक प्रायोगिक वातावरण निर्माण करण्याच्या शक्यता पडताळून पाहतील, जेणेकरून प्रगत डिजिटल उपाययोजनांची चाचणी आणि त्यांमध्ये सुधारणा करता येईल.

हे धोरणात्मक सहकार्य महाराष्ट्राच्या डिजिटल प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. दोन्ही संस्थांच्या या समन्वयामुळे नाविन्यपूर्ण, सुरक्षित आणि नागरिक-केंद्रित तांत्रिक उपाययोजनांचा मार्ग मोकळा होईल, ज्या सर्वसमावेशक विकासाला चालना देऊ शकतील आणि डिजिटल प्रशासनातील राज्याचे नेतृत्व अधिक बळकट करतील.

नाविन्यपूर्णता आणि प्रयोगांवर दिलेला भर, हे या कराराचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य होय. संकल्पना सिद्ध करणारे प्रकल्प आणि तंत्रज्ञानविषयक प्रायोगिक उपक्रमांसाठी संधी निर्माण करून, महाआयटी आणि सी-डॅक सार्वजनिक क्षेत्रात अंमलबजावणी करण्यापूर्वी अत्याधुनिक उपाययोजनांचे मूल्यमापन करू शकतील. हा दृष्टिकोन शासकीय कामकाजासाठी सुरक्षित, विस्तारक्षम आणि भविष्यासाठी सज्ज अशा डिजिटल प्रणालींच्या अंमलबजावणीला गती देण्यास मदत करेल.

या प्रसंगी बोलताना महाआयटीचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील म्हणाले: "सी-डॅक सोबतची ही भागीदारी म्हणजे महाराष्ट्राच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. महाआयटीची अंमलबजावणी क्षमता आणि सी-डॅकचे तांत्रिक कौशल्य यांचा मेळ घालून, आम्ही अशा नाविन्यपूर्ण, सुरक्षित आणि नागरिक-केंद्रित डिजिटल उपाययोजना निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यामुळे प्रशासन अधिक सक्षम होईल आणि सार्वजनिक सेवा वितरणामध्ये सुधारणा होईल. हे सहकार्य शासकीय संस्थांमध्ये भविष्यासाठी सज्ज अशा डिजिटल क्षमता निर्माण करण्यास आणि संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांच्या हितासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास गती देईल."

महाराष्ट्र राज्य डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार करत असताना, महाआयटी-सी-डॅक सहकार्य हे नवोन्मेषासाठी उत्प्रेरक ठरेल, अशी अपेक्षा आहे. हे सहकार्य सुशासन मजबूत करणाऱ्या, सेवा वितरणात सुधारणा घडवणाऱ्या तसेच नागरिक आणि सार्वजनिक संस्था या दोघांसाठीही चिरस्थायी मूल्य निर्माण करणाऱ्या प्रगत तंत्रज्ञान उपायांच्या विकासाला चालना देणारे ठरेल, याच शंका नाही.



# परिवर्तनकर्ते



## बदल घडवणारे व्यक्तिमत्त्व आरती दीपक देवमणे: ग्रामीण डिजिटल परिवर्तनाच्या शिल्पकार

महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासनाच्या यशस्वी प्रवासात अनेक अशा व्यक्ती आहेत, ज्यांनी निःस्वार्थ भावनेने काम करत शासकीय सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील जावळा गावच्या श्रीमती आरती दीपक देवमणे यांचे कार्य हे असेच एक प्रेरणादायी उदाहरण आहे. पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ त्या 'महा ई-सेवा केंद्रा'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा उपलब्ध करून देत असून, शासन आणि जनता यांच्यातील विश्वासार्ह दुवा म्हणून कार्यरत आहेत.

डिजिटल सेवा प्रणाली अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय दाखले, प्रमाणपत्रे आणि विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. साध्या कामांसाठीही तहसील कार्यालयापर्यंत प्रवास करणे, लांब रांगांमध्ये उभे राहणे आणि वेळ तसेच पैशाचा अपव्यय ही सामान्य बाब होती. या अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'सेतू' उपक्रम सुरू केला. त्यानंतर 2010 साली 'महा ई-सेवा केंद्र' संकल्पना राबविण्यात आली आणि गावपातळीवर डिजिटल माध्यमातून शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याचा नवा अध्याय सुरू झाला.

याच काळात श्रीमती आरती देवमणे यांनी जावळा येथे 'महा ई-सेवा केंद्र' सुरू केले आणि त्या ग्रामीण डिजिटल सक्षमीकरणात सहभागी झाल्या. बी.ए. आणि बी.एड. शिक्षण घेतलेल्या श्रीमती देवमणे यांनी या केंद्राकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले. ग्रामीण भागातील नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि कालबद्ध पद्धतीने शासकीय सेवा मिळाव्यात, हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

गेली अनेक वर्षे त्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे हजारो नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणे शक्य झाले आहे.

आधार नोंदणी मोहिमेदरम्यान त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय ठरले. 2013 ते 2018 या कालावधीत जावळा आणि परिसरातील ग्रामपंचायती, जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये विशेष आधार नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीत श्रीमती देवमणे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे परिसरातील सुमारे 97 ते 98 टक्के नागरिकांची आधार नोंदणी पूर्ण झाली. त्यामुळे हजारो नागरिकांचा वेळ, पैसा आणि तालुक्याच्या ठिकाणी जाऊन नोंदणी करण्याचा त्रास वाचला.

सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विद्यार्थ्यांसाठीही अनेक उपक्रम राबविले. सामाजिक संस्था आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी हाती घेतला. जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र तसेच प्रवेश, शिष्यवृत्ती आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्यात त्यांनी विशेष योगदान दिले. या उपक्रमाचा शेकडो विद्यार्थ्यांना लाभ झाला.

तत्कालीन तहसीलदार श्री. विजय कुलांगे यांनी त्यांच्या या कार्याचे विशेष कौतुक केले. जामखेड तालुक्यात अशा प्रकारचा उपक्रम प्रथमच राबविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले आणि हा उपक्रम इतर भागांसाठीही आदर्श ठरू शकतो, असे गौरवोद्गार काढले.

समाजातील वंचित, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि अल्पशिक्षित नागरिकांना शासकीय प्रक्रियांची माहिती देणे आणि त्यांना आवश्यक मदत करणे हे श्रीमती देवमणे यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. सोप्या भाषेत मार्गदर्शन करून त्यांनी हजारो नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ मिळवून दिला आहे.

आज त्यांचे 'महा ई-सेवा केंद्र' हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एक सर्वसमावेशक सेवा केंद्र बनले आहे. महाडीबीटी अर्ज, महसूल विभागाच्या सेवा, कृषी योजना, सामाजिक न्याय विभागाच्या योजना,

शिष्यवृत्ती, पेन्शन सेवा, पॅन कार्ड सेवा, बँक खाते उघडणे आणि डिजिटल पेमेंट सेवा अशा विविध सुविधा या केंद्रातून उपलब्ध करून दिल्या जातात.

त्यांच्या प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि कार्यक्षमतेमुळे समाजात त्यांच्याविषयी मोठा विश्वास निर्माण झाला आहे. याच विश्वासाच्या बळावर 2018 च्या ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांना मोठे जनसमर्थन लाभले, आणि त्या मोठ्या मताधिक्याने ग्रामपंचायत सदस्या म्हणून निवडून आल्या.

आज श्रीमती आरती दीपक देवमणे यांचे कार्य केवळ एका सेवा केंद्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. जावळा आणि परिसरातील अनेक कुटुंबांसाठी त्यांचे ‘महा ई-सेवा केंद्र’ हे विश्वास, मार्गदर्शन आणि विकासाचे केंद्र बनले आहे. नागरिकांना सन्मानपूर्वक, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे त्यांचे कार्य ग्रामीण डिजिटल परिवर्तनाचा आदर्श ठरले आहे.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांची सांगड घातल्यास ग्रामीण भागातही परिवर्तनाची नवी दिशा निर्माण करता येते हे आरती दीपक देवमणे यांच्या यशोगाथेतून दिसून येते. त्या खऱ्या अर्थाने ग्रामीण डिजिटल परिवर्तनाच्या शिल्पकार आहेत.



# तंत्रज्ञानाला लाभली सहृदयतेची साथ



## नाशिकमधील गरजू नागरिकांना 'घरपोच जीवन प्रमाणपत्र' उपक्रमाचा लाभ

**कुष्ठरोगग्रस्त, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग लाभार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिराने डिजिटल पडताळणी आणि घरपोच मदतीच्या माध्यमातून पेन्शन सेवांचा सुलभ लाभ सुनिश्चित केला.**

सामाजिक बांधिलकी आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाचे उल्लेखनीय उदाहरण म्हणून नाशिक जिल्ह्यात पंचवटी येथे कुष्ठरोगग्रस्त लाभार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विशेष जीवन प्रमाणपत्र शिबिराला भरघोस प्रतिसाद मिळाला. अनेक वृद्ध, अपंग, विधवा आणि सरकारी पेन्शन योजनांवर अवलंबून असलेल्या गरजू नागरिकांना या शिबिरामुळे मोठी मदत मिळाली आहे.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्यता विभागातर्फे निराधार व्यक्ती, विधवा, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध निवृत्तीवेतन योजना राबवल्या जातात. हे लाभ मिळत राहावेत, यासाठी लाभार्थ्यांना दरवर्षी जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. त्यासाठी लाभार्थींना सरकारी कार्यालयांना, विशेषतः तहसील कार्यालयाला प्रत्यक्ष भेट द्यावी लागत असे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि रुग्णावस्थेतील व्यक्तींसाठी हे मोठे आव्हान ठरत असे.

ही अडचण लक्षात घेऊन राज्य शासनाने चालू वर्षापासून ऑनलाइन जीवन प्रमाणपत्र पडताळणी प्रणाली सुरू केली. मात्र डिजिटल कार्यपद्धतींबद्दल जागरूकतेचा अभाव आणि ऑनलाइन औपचारिकता पूर्ण करण्यातील व्यावहारिक अडचणी, अनेक लाभार्थ्यांसाठी, विशेषतः समाजातील वंचित घटकांतील लाभार्थ्यांसाठी अडथळे निर्माण करत असल्याचे दिसून आले.

स्थानिक माजी नगरसेवक हेमंत शेट्टी, नगरसेवक सरिता सोनवणे आणि सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र निरभवणे यांच्या सक्रिय पाठिंब्याने नाशिकमधल्या पंचवटी कुष्ठरोगग्रस्त कल्याण संस्थेच्या पुढाकाराने हे विशेष मदत शिबिर आयोजित करण्यात आले. पात्र लाभार्थींना जीवन प्रमाणपत्र प्रक्रिया सुरळीतपणे आणि कोणत्याही त्रासाशिवाय पूर्ण करता यावी, हा या आयोजनामागचा मुख्य उद्देश होता.

18 आणि 19 मे 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या या दोन दिवसीय शिबिराला लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'आपले सरकार सेवा केंद्रा'चे चालक श्री. रवींद्र शिवाजी गायकवाड यांनी दाखवलेली तत्परता आणि केलेले विशेष प्रयत्न हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. विशेष म्हणजे त्यांनी शिबिराच्या परिसराबाहेर जाऊनही सेवा प्रदान केली. अत्यंत वृद्ध नागरिक, दिव्यांग आणि अंथरुणाला खिळलेले रुग्ण यांच्या मर्यादा लक्षात घेऊन, अशा लाभार्थ्यांच्या घरी त्यांनी प्रत्यक्ष भेट दिली आणि 'हयात प्रमाणपत्र' मिळवण्याची प्रक्रिया त्यांना घरपोच उपलब्ध करून दिली.

या नागरिकाभिमुख उपक्रमामुळे 178 लाभार्थ्यांनी आपल्या हयात प्रमाणपत्राची पडताळणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आणि त्यांना मिळणाऱ्या निवृत्तीवेतनाचे लाभ अखंडपणे सुरू राहतील, याची खातरजमा झाली.

शासकीय कल्याणकारी योजनांची उपलब्धता सुधारण्यासाठी श्री. रवींद्र गायकवाड यांनी सातत्याने काम केले आहे. यापूर्वी त्यांनी ईपीएस-95 निवृत्तीवेतनधारक आणि सेवानिवृत्त संरक्षण दलातील जवानांसाठी अनेक विशेष शिबिरे आयोजित केली आहेत, ज्यामुळे असंख्य निवृत्तीवेतनधारकांना विविध शासकीय लाभ आणि

कल्याणकारी सेवांचा लाभ घेण्यास मदत झाली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पात्र नागरिकांमध्ये सामाजिक सुरक्षा योजनांविषयी जागरूकता लक्षणीयरित्या वाढली आहे.

या शिबिराच्या निमित्ताने बोलताना श्री. गायकवाड म्हणाले की सामाजिक संस्था, स्वयंसेवी गट आणि सामुदायिक संस्था अशा प्रकारची शिबिरे आयोजित करण्यासाठी पुढे आल्या, तर जीवन प्रमाणपत्र सेवा लाभार्थ्यांना घरपोच उपलब्ध करून दिली जाऊ शकते, ज्यामुळे गरजू नागरिकांचे प्रभावी समावेशन शक्य होईल.

हा उपक्रम सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि सेवा पुरवठादार यांच्यातील सहकार्याचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे. शासकीय सेवा थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून, या शिबिराने प्रशासकीय प्रक्रियांची गुंतागुंत आणि त्यातील अडचणी कमी करतानाच प्रतिष्ठा, सुलभता आणि सामाजिक कल्याण या मूल्यांनाही बळ दिले आहे.

या शिबिराच्या माध्यमातून आपल्याला मिळालेल्या मदतीबद्दल लाभार्थ्यांनी समाधान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. घरपोच मिळालेल्या या सुविधेमुळे आपला बराच वेळ, श्रम आणि पैसा वाचल्याचे त्यांनी नमूद केले. ज्यांना कल्याणकारी योजनांची सर्वाधिक गरज आहे, त्यांच्यापर्यंत त्या प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सामुदायिक प्रयत्नांचे महत्त्व या शिबिराच्या यशामुळे अधोरेखित झाले आहे.

सामाजिक भान असलेले असे उपक्रम शासनाच्या कल्याणकारी सेवा वितरण प्रणालीला बळकट करण्यात आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा उपक्रमांमुळे पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री होते.



# सुशासन घरपोच



व्हीएलई: तानाजी गोविंद हत्तरगी ग्रामपंचायत - हलगरा, तालुका - निलंगा, जिल्हा- लातूर

## आधार नोंद सुधारणा करून व्हीएलईने दिला ज्येष्ठ नागरिकाला आधार

डिजिटल प्रशासन संपूर्ण महाराष्ट्रात नागरिक सेवांमध्ये परिवर्तन घडवत आहे, परिणामी नागरिकांच्या दृष्टीने अत्यावश्यक असणाऱ्या शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम होत आहेत. मात्र आधारसारख्या महत्त्वपूर्ण ओळख प्रणालींमध्ये तांत्रिक समस्या उद्भवतात, तेव्हा नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागू शकतो. लातूर जिल्ह्यात असेच एक प्रकरण निदर्शनास आले, मात्र महाआयटी आणि जिल्हा प्रशासनाच्या पाठिंब्याने, तानाजी हत्तरगी या सतर्क ग्रामस्तरीय उद्योजकाच्या हस्तक्षेपामुळे, आधार नोंदीशी संबंधित गंभीर समस्या वेळीच सोडवण्यात आली आणि एका ज्येष्ठ नागरिकाला मोठा दिलासा मिळाला.

श्री. व्यंकट नामदेवराव बिरादार हे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातल्या होसूर गावातले ज्येष्ठ नागरिक. विविध शासकीय योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी अतिशय महत्वाचे असणारे त्यांचे आधार ओळखपत्र अचानक निष्क्रिय झाले आणि त्यामुळे ते चांगलेच हवालदिल झाले.

विविध ठिकाणी प्रमाणीकरणासाठी आधार क्रमांक वापरण्याचा प्रयत्न केला असता त्यांना वारंवार अपयश येत राहिले. अखेर आधार पोर्टलवर पडताळणी केली असता, या समस्येच्या मूळाशी असलेले कारण ऐकून त्यांना धक्काच बसला. एका तांत्रिक त्रुटीमुळे, प्रणालीने त्यांना “मृत” (मृत स्थितीमुळे निष्क्रिय) म्हणून चिन्हांकित केले होते. त्यामुळे त्यांचा आधार क्रमांक निष्क्रिय झाला होता.

पेन्शनचे लाभ, बँकिंग सेवा, कल्याणकारी योजना आणि विविध शासकीय व्यवहारांसाठी आधार क्रमांक अनिवार्य असतो. अशात एका ज्येष्ठ नागरिकासाठी, हयात असतानाच डिजिटल पद्धतीने मृत घोषित केले जाणे, ही एक प्रचंड मोठी समस्या होती. यावर उपाय शोधण्यासाठी श्री. बिरादार यांनी जवळपास सहा महिने आपल्या जिल्ह्यातील विविध कार्यालयांना भेटी दिल्या, परंतु समस्येचे निराकरण झाले नाही.

ही बाब तानाजी हत्तरगी या ग्रामस्तरीय उद्योजकाच्या निदर्शनास आल्यानंतर समस्येचे गांभीर्य लक्षात घेत या ज्येष्ठ नागरिकाला मदत करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय आणि महाआयटी कार्यालयाशी त्यांनी संपर्क साधला, या प्रकरणाविषयी सविस्तर माहिती दिली आणि तातडीच्या हस्तक्षेपाची विनंती केली.

जिल्हा प्रशासन आणि ई-प्रशासन कार्यालयाच्या तत्पर प्रतिसादामुळे हे प्रकरण मार्गी लावण्यास मदत झाली. प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर, अधिकाऱ्यांनी तानाजी हत्तरगी यांना आधार सुधारणा प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. आधार क्लायंट यूसी प्रणालीद्वारे आवश्यक पडताळणी आणि अद्ययावतीकरण प्रक्रिया शक्य होईल आणि या समस्येचे निराकरण करता येईल, असा सल्ला ई-प्रशासन कार्यालयाने 3 जून 2026 रोजी दिला.

त्यानुसार श्री. तानाजी हत्तरगी यांनी श्री. बिरादार यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना आधार केंद्राला तात्काळ भेट देता येईल, याची व्यवस्था केली. आवश्यक बायोमेट्रिक अपडेट तातडीने पूर्ण केल्यामुळे प्रणालीमध्ये नागरिकाच्या ओळखीची पुन्हा पडताळणी करणे सुलभ झाले.

पुढच्या 24 तासांत, म्हणजेच 4 जून 2026 रोजी, श्री. बिरादार यांना एक एसएमएस प्राप्त झाला. आधार कार्डवर यशस्वीरित्या प्रक्रिया होऊन ते ऑनलाइन पुनर्सक्रिय झाल्याचे त्यांना या एसएमएस द्वारे कळविण्यात आले. त्यानंतर लगेचच त्यांनी आधार संकेतस्थळाला

भेट दिली आणि केंद्रातून सक्रिय आधार कार्ड प्राप्त केले.

आधार सक्रिय होणे ही बिरादार यांच्यासाठी केवळ एक तांत्रिक दुरुस्ती नव्हती, तर ती त्यांच्या ओळखीची, प्रतिष्ठेची आणि अत्यावश्यक सेवांच्या उपलब्धतेची पुनर्प्राप्ती होती. या मदतीबद्दल त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, महाआयटी, ई-गव्हर्नन्स टीम आणि व्हीएलई तानाजी हत्तरगी यांचे मनापासून आभार मानले.

महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासन परिसंस्थेमध्ये ग्रामस्तरीय उद्योजक बजावत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका या प्रकरणातून अधोरेखित होते. डिजिटल सेवा प्रदानातील आव्हानांना सामोरे जाणाऱ्या नागरिकांसाठी ग्रामस्तरीय उद्योजक अनेकदा संपर्काचे पहिले माध्यम असतात. त्यांची उपस्थिती, वचनबद्धता आणि समस्या सोडवण्याची क्षमता, ग्रामीण भागांमध्ये, तंत्रज्ञान आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यास सहायक ठरते.

तळागाळातील संपर्क, प्रतिसादक्षम प्रशासन आणि तांत्रिक कौशल्ये यांचा मेळ घालून नागरिकांच्या समस्या जलद आणि कार्यक्षमतेने सोडवल्या जाऊ शकतात, हे या उदाहरणावरून दिसून येते. डिजिटल प्रशासन केवळ प्रणाली आणि प्लॅटफॉर्मपुरते मर्यादित नाही तर प्रत्येक नागरिकाला वेळेवर, विश्वासार्ह आणि सन्मानजनक सेवा मिळेल याची खात्री करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वचनबद्धता आणि समन्वयाला माणुसकीची जोड लाभली आणि तब्बल सहा महिने प्रलंबित असणाऱ्या समस्येचे एका दिवसात निराकरण झाले. त्यायोगे नागरिक-केंद्रित शासनाचा उद्देश साध्य झाला, ही निश्चितच समाधानाची बाब आहे.



# डिजिटल करुणेची प्रत्यक्ष कृती



*जिल्हा प्रशासन, महाआयटी आणि यूआयडीएआय यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील एका वृद्ध दाम्पत्याच्या अनेक प्रशासकीय अडचणी अवघ्या तीस मिनिटांत दूर करण्यात आल्या. या प्रसंगातून तंत्रज्ञानाधारित, नागरिकाभिमुख आणि संवेदनशील प्रशासनाचे दर्शन घडले.*

## डिजिटल प्रशासनाला मानवतेचा स्पर्श: लातूरमध्ये वृद्ध दाम्पत्याला मिळाला सन्मानाने हक्काचा लाभ...

शासकीय सेवा मिळवण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांच्या अनेक फेऱ्या माराव्या लागतात, अनेकदा वेळ वाया जातो आणि प्रक्रियेत विलंब होतो, अशी सर्वसाधारण धारणा आहे. लातूर जिल्हा प्रशासनाने मात्र तंत्रज्ञान, समन्वय आणि तत्परतेची सांगड घालून ही धारणा खोटी ठरवत सार्वजनिक सेवा वितरणाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

निलंगा येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती रसिकबाई बाबुराव हुग्गे यांचे आधार कार्ड तांत्रिक कारणांमुळे निष्क्रिय झाले होते. त्यामुळे त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येत नव्हता. त्यांच्यासाठी वृद्धापकाळात या योजनांचा आधार अत्यंत महत्त्वाचा असताना ही समस्या त्यांच्या रोजच्या जगण्यावर प्रतिकूल परिणाम करणारी ठरत होती.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्षाने तातडीने पुढाकार घेतला. महाआयटी, माहिती तंत्रज्ञान आयुक्तालय आणि यूआयडीएआय यांच्या समन्वयातून समस्येच्या निराकरणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

तक्रार प्राप्त होताच जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्षाने यूआयडीएआयच्या मुंबई येथील प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क साधला. यूआयडीएआयचे उपसंचालक श्री. मंदार जेवरे आणि विभागीय व्यवस्थापक श्री. गेहलोत यांच्या सहकार्यामुळे श्रीमती हुग्गे यांचे निष्क्रिय झालेले आधार कार्ड पुन्हा सक्रिय करण्यात आले.

रसिकबाईंच्या संदर्भात अजून काही अडचणी आहेत का, हे सुद्धा प्रशासनाने तपासले आणि पेन्शनसह इतर शासकीय लाभ अखंडितपणे मिळण्यासाठी आवश्यक असलेले हयात प्रमाणपत्रसुद्धा तातडीने तयार करण्यात आले. संजय गांधी निराधार योजना शाखेच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार श्री. कदम यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण केली.

विशेष म्हणजे आधार कार्ड पुन्हा सक्रिय करणे आणि हयात प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे, ही संपूर्ण प्रक्रिया अवघ्या तीस मिनिटांत पूर्ण झाली.

लातूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते श्रीमती हुग्गे यांना आवश्यक कागदपत्रे सुपूर्द करण्यात आली. यावेळी, त्यांचे पती श्री. बाबुराव हुग्गे यांनाही पेन्शन अर्जसंदर्भात मदतीची आवश्यकता असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

त्यांना पुन्हा कार्यालयात येण्यास सांगण्याऐवजी प्रशासनाने तत्काळ त्यांचा पेन्शन अर्ज स्वीकारला आणि संबंधित योजनेची कार्यवाही त्याच ठिकाणी सुरु केली. एका समस्येच्या निराकरणासाठी आलेल्या या वृद्ध दाम्पत्याच्या अनेक अडचणी एकाच भेटीत दूर करण्यात आल्या.

ही घटना केवळ प्रशासकीय कार्यक्षमतेचे उदाहरण नाही, तर नागरिकांच्या सर्व गरजांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणाऱ्या आधुनिक प्रशासनाची ओळख आहे. विभागनिहाय कामकाजाच्या पलीकडे जाऊन नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद होता.

जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्षाच्या अधिकाऱ्यांच्या मते महाआयटीचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय काटकर (भाप्रसे), माहिती तंत्रज्ञान आयुक्त श्रीमती भुवनेश्वरी (भाप्रसे) यांचे मार्गदर्शन आणि यूआयडीएआयसोबतचा प्रभावी समन्वय यामुळे ही कार्यवाही वेगाने आणि यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकली.

या घटनेतून डिजिटल प्रशासनाची खरी ताकद अधोरेखित होते. तंत्रज्ञान, समन्वय आणि मानवी संवेदनशीलता यांचा त्रिवेणी संगम साधला तर प्रशासन केवळ कार्यक्षम राहत नाही, तर नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवणारे माध्यम बनते.

श्रीमती रसिकबाई हुग्गे आणि श्री. बाबुराव हुग्गे यांनी लातूर जिल्हा प्रशासन, महाआयटी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, यूआयडीएआय आणि संबंधित सर्व अधिकाऱ्यांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

या लेखातील 'लातूर मॉडेल' ही घटना एक महत्त्वाचा संदेश देते. प्रभावी प्रशासनाचे यश केवळ धोरणे आणि तंत्रज्ञानात नसते, तर त्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात घडणाऱ्या सकारात्मक बदलात असते. डिजिटल पायाभूत सुविधा आणि संवेदनशील प्रशासन यांच्या समन्वयातून, कोणताही नागरिक, विशेषतः ज्येष्ठ आणि गरजू नागरिक शासकीय सेवांपासून वंचित राहणार नाही, याची खातरजमा महाराष्ट्र शासन करत आहे.

# डिजिटल परिवर्तन




## अडथळ्यांवर मात
## कळवणचे अमोल खैरनार यांच्या जिद्दीचा प्रवास

वादळे कितीही मोठी असली, तरी आशेचा दिवा विझत नाही, संघर्ष कितीही कठीण असला, तरी जिद्द हार मानत नाही...

देवभूमी अशी ओळख असणाऱ्या नाशिक जिल्ह्याने अनेक कर्तृत्ववान माणसे घडवली आहेत. याच नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यात सकाळचे नऊ वाजले की एका लहानशा कार्यालयाबाहेर नागरिकांची रांग लागायला सुरुवात होते. कोणाला उत्पन्नाचा दाखला हवा असतो, कोणाला जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करायचा असतो, एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यासाठी आलेला असतो, तर एखादा शेतकरी शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रे घेऊन उभा असतो. काहींना ऑनलाईन अर्ज कसा करायचा हेच माहिती नसते, तर काही जण मोबाईल हातात असूनही डिजिटल प्रक्रियेपासून अनभिज्ञ असतात.

रांगेतल्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर एक विश्वास असतो, अमोलभाऊ आहेत ना, मग आपले काम नक्की होणार. ही फक्त एका सेवा केंद्राची गोष्ट नाही. हा एका अशा व्यक्तीचा प्रवास आहे, ज्याने स्वतःच्या आयुष्यातील अंधारातून बाहेर पडत अनेकांची आयुष्ये विश्वासाच्या प्रकाशाने उजळली आहेत.

या आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक अमोल खैरनार आज ज्या आत्मविश्वासाने नागरिकांच्या समस्या सोडवतात, तो आत्मविश्वास एका दिवसात निर्माण झालेला नाही. आज वयाच्या 46 व्या वर्षी ते यशस्वीरित्या आपले सरकार सेवा केंद्र चालवित आहेत. मात्र काही वर्षांपूर्वी त्यांचे आयुष्य पूर्णपणे वेगळे होते.

बी. ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी कळवणमध्ये फोटोग्राफीचा स्टुडिओ सुरु केला. लग्नसमारंभ, वाढदिवस आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे छायाचित्रण करण्याबरोबरच स्टुडिओमध्ये फोटो काढण्याचे कामसुद्धा चांगले चालत होते. हळूहळू त्यांनी आपला जम बसवला होता. सकाळपासून रात्रीपर्यंत छायाचित्रण, त्यांचे एडीटींग, ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करणे यातच त्यांचा वेळ जात असे. कुटुंबही आनंदात होते. आयुष्य हळूहळू स्थिरस्थावर होत होते. पण आपण नियोजन करू तसेच नेहमी होईल, याची खात्री देता येत नाही, याचा प्रत्यय अमोलना लवकरच आला.

कोविड साथरोगाने संपूर्ण जगाबरोबरच अमोल खैरनार यांच्याही आयुष्याला अचानक ब्रेक लावला. लग्नसमारंभ बंद झाले, कार्यक्रम रद्द झाले, सगळे लोक घरात राहू लागले, फोटो स्टुडिओचे दार बंद झाले. असे काही महिने उलटले. हाताला काम नव्हते, बचत संपत होती. घरखर्चाचा प्रश्न होता, कुटुंबाची जबाबदारी होती. उद्या काय करायचे, हा प्रश्न रोज सकाळी नव्याने समोर येत होता. काम नाही, उत्पन्न नाही. हा प्रश्न केवळ आर्थिक नव्हता, तो मानसिक त्रास वाढवणाराही होता. नैराश्याची भावना हळूहळू मनात घर करू लागली होती.

याच काळात खैरनार एके दिवशी काही कामानिमित्त तहसील कार्यालयात गेले. तिथे नागरिक अर्ज भरत होते, काही लोक कागदपत्रांची पूर्तता करत होते. तेव्हा "आपले सरकार सेवा केंद्रात ही कामे होतात, तिथे जा," हे वाक्य त्यांच्या कानावर पडले. खैरनार यांना उत्सुकता वाटली आणि त्यांनी चौकशी केली. आपले सरकार सेवा केंद्र म्हणजे नेमके काय, तिथे काय होते, हे केंद्र कुठे असते, कोण चालवू शकते, यातून रोजगार मिळू शकतो का, अशी सर्व माहिती त्यांनी मिळवली. त्या दिवसाने त्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवून आणला.

सर्व माहिती समजून घेतल्यानंतर, हीच योग्य संधी आहे आणि ही आपल्याला गमवायची नाही, असे त्यांनी मनाशी ठरवले. त्यांनी तातडीने अर्ज केला, आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आणि काही दिवसांत त्यांना आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याची संधी मिळाली.

केंद्र सुरु झाले. मात्र फोटोग्राफी आणि आपले सरकार सेवा केंद्र या दोन्ही कामांचे स्वरुप पूर्णपणे वेगळे होते. आपले सरकार सेवा केंद्रावर नागरिकांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांची जबाबदारी होती. अर्जातील एका चुकीमुळे एखाद्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती अडकू शकत होती, लाभार्थी शेतकरी लाभापासून वंचित राहू शकत होता.

उत्पन्न, जात, अधिवास, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्रे, वेगवेगळे शासकीय दाखले, परवानग्या, विविध विभागांच्या सेवा, ऑनलाइन अर्ज, शासकीय योजनांसाठी नोंदणी, तक्रारी, अर्जांचा पाठपुरावा अशा

असंख्य सेवांसाठी नागरिक सेवा केंद्रावर अवलंबून असतात. शासनाच्या विविध विभागांच्या शेकडो सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत, शासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करणे हा 'आपले सरकार' व्यवस्थेचा उद्देश आहे.

अमोल खैरनार सांगतात, सुरुवातीला प्रत्येक दिवस हा शिकण्याचा होता. प्रत्येक सेवेची स्वतंत्र प्रक्रिया, वेगवेगळ्या विभागांचे नियम, कागदपत्रांची पडताळणी, ऑनलाईन प्रणाली, वेळोवेळी बदलणारे शासन निर्णय समजून घेण्यासाठी दिवस-रात्र अभ्यास केला. घरी गेल्यावरही संगणकासमोर बसून सेवा आणि योजना समजून घेणे सुरुच असायचे. एखादी अडचण आली तर वरिष्ठांशी संपर्क साधायचा, मॅन्युअल वाचायचे, पुन्हा प्रयत्न करायचे. केंद्र सुरु करणे सोपे होते, पण नागरिकांचा विश्वास जिंकणे सर्वात कठीण होते, असे खैरनार म्हणतात.

अनेकदा नागरिकांना घाई असते, पुरेशा कागदपत्रांअभावी ते तणावाखाली असतात. अशावेळी अमोल खैरनार त्या व्यक्तीची समस्या समजून घेऊन योग्य मार्गदर्शन करतात, त्यांची प्रक्रिया पूर्ण करून देतात. "तुमचे काम नक्की होईल, काळजी करू नका," असे सांगून त्यांना दिलासा देतात. यामुळेच या सेवा केंद्रात गेल्यावर अडचणी दूर होतात, कामे होतात, असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे.

आज शासनाच्या बहुतेक सेवा डिजिटल झाल्या आहेत. मात्र ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना ऑनलाइन प्रक्रिया, कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची स्थिती तपासणे किंवा विविध योजनांची माहिती मिळवणे सहज शक्य होत नाही. अशावेळी आपले सरकार सेवा केंद्र हा शासन आणि नागरिक यांना जोडणारा महत्त्वाचा पूल ठरतो.

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज असोत, उत्पन्न, जात, अधिवास, ज्येष्ठ नागरिक, जन्म-मृत्यू दाखले, विविध विभागांच्या परवानग्या, शासनाच्या योजनांसाठी अर्ज, प्रमाणपत्रे, तक्रारी किंवा इतर ऑनलाइन सेवा असो, या सर्व प्रक्रियेत नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी अमोलसारखे सेवा केंद्र चालक सातत्याने कार्यरत असतात. कागदपत्रांची पडताळणी, अर्जातील त्रुटी दूर करणे, नागरिकांना आवश्यक माहिती समजावून सांगणे, वेळेत अर्ज सादर करणे आणि आवश्यक तेव्हा संबंधित विभागाशी समन्वय साधणे अशा सर्व जबाबदाऱ्या ते समर्थपणे पार पाडत असतात.

अमोल खैरनार यांच्यासाठी प्रत्येक अर्ज म्हणजे केवळ एक व्यवहार नसतो, तर एखाद्या कुटुंबाची अपेक्षा असते, एखाद्या विद्यार्थ्याचे भवितव्य असते, किंवा एखाद्या शेतकऱ्याची आशा असते.

वरकरणी पाहता संगणकावर काम करण्याचा हा व्यवसाय सोपा वाटू शकतो, प्रत्यक्षात मात्र त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, अद्ययावत माहिती आणि संयमाची मोठी गरज असते. शासनाचे नवीन निर्णय, बदलणाऱ्या ऑनलाइन प्रणाली, नव्याने सुरू होणाऱ्या योजना, तांत्रिक अडचणी, इंटरनेट-सर्व्हर समस्या, नागरिकांच्या शंका, कागदपत्रांतील त्रुटी या सर्वांशी दोन हात करत प्रत्येक दिवस नव्या आव्हानांसह सुरू होतो.

विशेषतः इयत्ता दहावी-बारावीच्या निकालानंतर पुढच्या प्रवेशासाठी किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी किंवा भरती प्रक्रियांच्या वेळी केंद्रात प्रचंड गर्दी होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत नागरिकांची रांग लागते. प्रत्येकाचे काम सारखेच महत्त्वाचे असते. कोणाला तत्काळ दाखला हवा असतो, कोणाचा अर्ज शेवटच्या तारखेपूर्वी भरायचा असतो, तर कोणाच्या कागदपत्रात दुरुस्ती करायची असते. अशा वेळी घाईपेक्षा अचूकतेला प्राधान्य देणे आवश्यक असते. या जबाबदारीची जाणीव बाळगून अमोल खैरनार प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक हाताळतात.

कोणत्याही यशस्वी व्यक्तीच्या प्रवासात कुटुंबाची भूमिका महत्त्वाची असते. अमोल खैरनार यांचे यशसुद्धा याला अपवाद नाही. त्यांच्या कुटुंबीयांनी सुरुवातीपासूनच या नव्या व्यवसायावर विश्वास दाखवला. कामाचा व्याप वाढू लागला आणि हंगामी गर्दीमुळे एकट्याने सर्व कामे सांभाळणे अशक्य होऊ लागले. याच वेळी त्यांच्या वडिलांनी आणि त्यांच्या पत्नीने केंद्रातील अनेक जबाबदाऱ्या स्वतःहून स्वीकारल्या. आज केंद्रातील दैनंदिन कामकाजात त्यांचा मोलाचा सहभाग आहे. याशिवाय दोन प्रशिक्षित परिचालक सुद्धा नागरिकांना सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत.

कळवण आणि परिसरातील अनेक गावांमध्ये आज अमोल खैरनार यांची ओळख केवळ सेवा केंद्र चालक इतकी मर्यादित नाही, अनेक जण सल्लागार म्हणूनही त्यांची भेट घेतात. शासनाच्या योजनेचा लाभ कसा घ्यायचा, अर्ज का रखडला, पुढची प्रक्रिया काय, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी लोक थेट त्यांच्या केंद्रात येतात. अनेकदा चक्क कौटुंबिक समस्या किंवा व्यावसायिक समस्या सुद्धा घेऊन येतात.

खैरनार सांगतात, "नागरिक केवळ ग्राहक म्हणून केंद्रात येत नाही, तर शासनाकडून न्याय आणि सुविधा मिळतील या अपेक्षेने येतो. त्या अपेक्षेचा मान राखणे, आणि तशी सेवा देणे हीच आमची खरी जबाबदारी आहे."

आपले सरकार सेवा केंद्रामुळे अमोल खैरनार यांना रोजगार मिळाला, तसेच समाजात एक वेगळी ओळखही मिळाली. आज या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरळीत सुरु आहे. त्याचबरोबर ते शेतीसुद्धा करत आहेत. महत्त्वाचे म्हणजे स्वतःचे आयुष्य सावरताना त्यांनी हजारो नागरिकांचेही काम सुलभ केले आहे.

डिजिटल महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञानाबरोबरच तळागाळात मनापासून काम करणाऱ्या माणसांची गरज असते. अमोल खैरनार यांच्यासारखे आपले सरकार सेवा केंद्र परिचालक हे या परिवर्तनाचे खरे शिल्पकार आहेत.

# डिजिटल समावेशन




## ग्रामस्थांच्या गरजांना अनुकूल डिजिटल परिवर्तन: नाशिकचे राहुल बरकले यांची प्रेरणादायी यशोगाथा

प्रत्येक गावाला एक ओळख असते. काही गावे इतिहासासाठी प्रसिद्ध असतात, काही निसर्गासाठी तर काही श्रद्धास्थानासाठी. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात वसलेले कसबे सुकेणे हे असेच एक गाव. श्री गुरुदेव दत्त मंदिरासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. या गावचे ग्रामस्थ राहुल बरकले हे डिजिटल सेवांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्यासाठी सक्रिय योगदान देत आहेत.

बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स ही पदवी धारण करणारे तीस वर्षीय राहुल बरकले हे या गावातील आपले सरकार सेवा केंद्राचे ग्रामस्तरीय उद्योजक आहेत. आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे इथल्या ग्रामस्थांसाठी त्यांची शासकीय कामे मार्गी लावणारी हक्काची व्यक्ती अशी ओळख त्यांनी निर्माण केली आहे.

त्यांच्या आपले सरकार सेवा केंद्रात दिवसभर नागरिकांची वर्दळ असते. काही विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अर्ज घेऊन आलेले असतात, शेतकरी शासनाच्या योजनेची माहिती विचारत असतात, महिला विविध प्रमाणपत्रांसाठी अर्ज करत असतात, तर वृद्ध नागरिक पेन्शन किंवा इतर सेवांबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी आलेले असतात.

राहुल बरकले हे बीसीएचे शिक्षण घेत होते. त्यांना संगणकाची आवड होती, तंत्रज्ञान समजत होते. त्याच वेळी शिक्षण घेताना कुटुंबालाही आर्थिक हातभार लावण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. त्यांनी या विषयावर मित्रांसोबत चर्चा केली. गावात सायबर कॅफे सुरु करावा, अशी कल्पना समोर आली. मोठ्या शहरांमध्ये प्रत्येकाच्या हातात मोबाईल आणि इंटरनेट तसेच अनेक सार्वजनिक ठिकाणी मोफत इंटरनेटची सुविधा असल्यामुळे तिथली सायबर कॅफेची गरज कमी होत चालली होती, परंतु ग्रामीण भागातील चित्र वेगळे होते.

प्रमाणपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज, कॉलेजचे प्रवेश अर्ज, स्पर्धा परीक्षांचे अर्ज, विद्यार्थ्यांचे प्रकल्प, रेल्वे किंवा बसचे आरक्षण, वीज बिल भरणे, नोकरीसाठी ईमेल पाठवणे, प्रिंटआऊट, स्कॅनिंग अशा कामांसाठी ग्रामस्थांना संगणक असलेल्या ठिकाणी जावे लागत असे. हीच गरज ओळखून राहुल यांनी मित्रांच्या मदतीने आपला छोटेखानी सायबर कॅफे सुरु केला. भांडवल मोठे नव्हते, पण स्वप्न मात्र मोठे होते.

सायबर कॅफे सुरु झाल्यानंतर सुरुवातीला वेगवेगळ्या प्रकारची ऑनलाइन कामे येऊ लागली. त्यात उत्पन्नाचा दाखला मिळेल का, जात प्रमाणपत्राचा अर्ज भरुन द्याल का, शासकीय योजनेसाठी ऑनलाइन अर्ज करता येईल का, अर्ज कुठे भरायचा, कागदपत्रे कोणती लागतील, असे प्रश्न विचारले जाऊ लागले. नागरिकांना संगणक, इंटरनेटबरोबरच योग्य मार्गदर्शनाची गरज आहे, हे राहुल यांच्या लक्षात आले. नागरिकांना शासकीय कार्यालयांची प्रक्रिया समजत नव्हती. ऑनलाईन प्रणालीची माहिती नव्हती. अर्ज भरताना होणाऱ्या चुकांमुळे कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. या समस्या लक्षात आल्यानंतर त्या सोडवण्याचा विचार राहुल यांच्या मनात रुजला.

त्यांनी वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन माहिती मिळवायला सुरुवात केली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत उपलब्ध होणाऱ्या सेवांचा अभ्यास केला, प्रक्रिया समजून घेतली, नियम आणि निकष समजून घेतले. शासकीय प्रणालीमध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आत्मसात केली. राहुल म्हणतात, "तंत्रज्ञान शिकणे सोपे असते, पण नागरिकांच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया समजून घेणे जास्त महत्त्वाचे असते." याच काळात त्यांना आपले सरकार सेवा केंद्राविषयी माहिती मिळाली. शासनाच्या विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देणारे हे व्यासपीठ ग्रामीण भागासाठी उपयुक्त असल्याची जाणीव त्यांना झाली आणि त्यांनी तातडीने अर्ज केला. 2021 साली त्यांचे आपले सरकार सेवा केंद्र सुरु झाले, आणि लोकसेवेच्या संकल्पाला नवे बळ मिळाले.

सामान्यत: नवीन व्यवसाय सुरू केल्यानंतर ग्राहक मिळवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते, असे म्हणतात. राहुल यांच्या बाबतीत मात्र परिस्थिती वेगळी होती. सायबर कॅफेमुळे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाशी संलग्न नागरिक सेवा देत असल्यामुळे त्यांचे ग्रामस्थांशी विश्वासाचे  नाते निर्माण झाले होते. राहुल यांच्या केंद्रात गेल्यावर ते सर्व गोष्टी समजावून सांगतात, आपली कामे मार्गी लावतात, असा विश्वास ग्रामस्थांना वाटू लागला होता.

आपले सरकार सेवा केंद्र सुरू झाल्यानंतर तो विश्वास अधिक दृढ झाला. आज त्यांच्या केंद्रामध्ये उत्पन्न, जात, अधिवास, जन्म-मृत्यू दाखले, विविध शासकीय प्रमाणपत्रे, शिष्यवृत्ती अशा अनेक शासकीय योजनांसाठी अर्ज, परवानग्या, ऑनलाइन नोंदणी, विविध विभागांच्या सेवा, पाठपुरावा अशा बाबींसाठी नागरिकांची गर्दी असते.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे केंद्र म्हणजे शासन त्यांच्या दाराशी आल्याची भावना निर्माण करणारे आहे. स्थानिक नागरिकांच्या विश्वासामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकही आपली कामे घेऊन या केंद्रात येऊ लागले. नागरिकांची वर्दळ वाढू लागल्याने, एकट्याने सर्व जबाबदाऱ्या सांभाळणे कठीण होऊ लागले आणि त्यांच्या भावाने केंद्रात पूर्ण वेळ काम पाहण्यास सुरुवात केली. आता त्यांच्या बरोबर एक प्रशिक्षित परिचालक सुद्धा कार्यरत आहे.

आज हे केंद्र एका कुटुंबाच्या मेहनतीवर आणि टीमवर्कवर सुरळीतपणे चालते आहे. राहुल म्हणतात, सेवा क्षेत्रात एकट्याला यश मिळत नाही. सर्वांनी समन्वय साधून काम केले तरच नागरिकांना वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा देता येते. राहुल बरकले यांच्या कामाची दखल घेत अलिकडेच त्यांना उत्कृष्ट व्हीएलई म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. मात्र बरकले म्हणतात, "आमच्याकडून सेवेचा लाभ घेतल्यानंतर जेव्हा एखादा नागरिक दुसऱ्या दिवशी आपल्या नातेवाईकाला घेऊन येतो आणि म्हणतो, यांच्याकडे जा, तुमचे काम नक्की होईल, तेव्हा तो आमच्यासाठी खरा पुरस्कार असतो. त्यापेक्षा मोठे प्रमाणपत्र नाही."

बरकले यांच्या केंद्रात अनेकदा कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही नागरिक येतात. काहींना शेवटच्या तारखेपूर्वी अर्ज भरायचा असतो. काहींना तातडीची कागदपत्रे हवी असतात. शक्यतो राहुल त्यांना नकार देत नाहीत. "सेवा ही घड्याळाच्या काट्यावर चालत नाही, ती कार्यालयीन कामकाजाची वेळकाळ पाहत नाही", असे ते म्हणतात.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे शासनाच्या शेकडो सेवा आज ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. मात्र या सेवांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी तळागाळात कार्य करणाऱ्या राहुलसारख्या ग्रामस्तरीय उद्योजकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. राहुलसारखे तरुण ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता वाढवत आहेत. नागरिकांना शासनाच्या सेवा सहज मिळाव्यात, यासाठी ते मार्गदर्शक, समन्वयक आणि विश्वासू सहकारी म्हणून काम करत आहेत.

आज ते या व्यवसायात स्थिरावले आहेत. त्यांना समाजात मान-सन्मान मिळतो आहे, पुरस्कारही मिळाला आहे. पण राहुलना इतक्यावर थांबायचे नाही. त्यांना आपल्या परिसरातील प्रत्येक नागरिकाला डिजिटल सेवांबाबत सक्षम करायचे आहे. लोकांनी शासकीय योजनांचा लाभ माहितीअभावी गमावू नये, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

यश मिळवण्यासाठी मोठ्या शहरांकडेच धाव घेतली पाहिजे असे नाही. गावाच्या गरजा समजून घेतल्या तर गावातूनही मोठे परिवर्तन घडवता येते, हे राहुल यांच्या या प्रवासावरून दिसून येते. डिजिटल महाराष्ट्राच्या वाटचालीत अशा युवा उद्योजकांचे योगदान केवळ सेवा पुरविण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते शासन आणि नागरिक यांच्यात विश्वासाचा सेतू उभारण्याचे मोलाचे काम करत आहेत.



# आपले सरकार सेवा केंद्र चालकांच्या यशोगाथा




## सेवेतून मिळाली प्रतिष्ठा: ननाशी'चे अजीज शेख यांची नागरिकाभिमुख यशोगाथा

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातले 'ननाशी' हे डोंगररांगांनी वेढलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक सुंदर गाव. शहरांच्या तुलनेत या गावात रोजगाराच्या संधी मर्यादित असल्या, तरी मेहनत करणाऱ्यांची कमतरता नाही. या गावाचे रहिवासी असणारे अजीज शेख यांनी आपल्या जिद्दीच्या बळावर केवळ रोजगाराचे साधन निर्माण केले नाही, तर परिसरातील नागरिकांसाठी शासनाच्या डिजिटल सेवांचे विश्वासार्ह केंद्रही उपलब्ध करून दिले.

'ननाशी' मधले सगळे ग्रामस्थ अजीज यांना त्यांच्या नावाने ओळखतात. शासकीय कामांसाठी मार्गदर्शन हवे असेल, प्रमाणपत्रासाठी अर्ज भरायचा असेल किंवा एखाद्या योजनेबाबत माहिती घ्यायची असेल, तर नागरिकांची पावले अजीज यांच्या आपले सरकार सेवा केंद्राकडे वळतात. मात्र हा विश्वास एका दिवसात निर्माण झालेला नाही.

अजीज शेख यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती साधारण होती. गावात मोठे उद्योग नव्हते किंवा रोजगाराच्या भरपूर संधीही उपलब्ध नव्हत्या. प्राप्त साधनांमधून रोजगार शोधणे, हाच पर्याय उपलब्ध होता. अजीज यांनी फोटोकॉपीचे (झेरॉक्स) लहानसे दुकान सुरू केले. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, शेतकरी, नोकर भरतीसाठी अर्ज करणारे युवक असे अनेक जण आवश्यक कागदपत्रांच्या प्रती काढण्यासाठी त्यांच्या दुकानात येऊ लागले.

दररोज दुकानात येणाऱ्या ग्राहकांपैकी अनेकजण शासकीय सेवा आणि प्रमाणपत्रांसाठी कोणती कागदपत्रे लागतील, ऑनलाइन अर्ज कुठे भरता येईल, शासकीय दाखल्यासाठी अर्ज कसा करायचा, असे प्रश्न वारंवार विचारत. सुरुवातीला अजीज यांच्याकडे या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे नसत. पुरेशा माहितीअभावी अनेकदा नागरिकांना इतरत्र जाण्याचा सल्ला द्यावा लागत असे. मात्र ही उत्तरे आपल्याकडे असली पाहिजे, असे त्यांना वाटू लागले होते. ग्राहकांच्या प्रश्नांकडे त्यांनी वेगळ्या दृष्टीने पाहायला सुरुवात केली. या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यांनी विविध स्तरांवर माहिती घेतली, आणि त्यांना आपले सरकार सेवा केंद्राविषयी माहिती मिळाली. शासनाच्या विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारी ही व्यवस्था ग्रामीण भागासाठी अत्यंत उपयुक्त आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

अजीज यांनी आपले सरकार सेवा केंद्रासाठी आवश्यक निकषांची माहिती मिळवली, आपली पात्रता पडताळून पाहिली आणि अर्ज सादर केला. आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही महिन्यांतच त्यांना आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळाली आणि त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्याला सुरुवात झाली.

नागरिकांना केवळ सेवा देणे पुरेसे नाही, तर त्यांना योग्य माहिती मिळाली पाहिजे, असा विचार अजीज यांनी केला. त्यासाठी त्यांनी सर्व सेवा आणि योजनांची माहिती देणारे फलक आपल्या केंद्रात लावले. कोणत्या सेवेसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, अर्जाची प्रक्रिया काय आहे, ही माहिती नागरिकांना सहज समजेल, अशा पद्धतीने उपलब्ध करून दिली.

आपल्या केंद्रासाठी त्यांनी एक कार्यपद्धती तयार केली. प्रथम नागरिकांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे, प्रक्रिया समजावून सांगणे आणि मगच अर्जाची नोंदणी करणे, असे या कार्यपद्धतीचे स्वरूप होते. या पद्धतीमुळे नागरिकांचा वेळ वाचू लागला. अपूर्ण कागदपत्रांमुळे होणारी गैरसोय कमी झाली. गर्दीचे व्यवस्थापनही अधिक प्रभावीपणे होऊ लागले.

आज शासनाच्या अनेक सेवा पूर्णपणे डिजिटल झाल्या आहेत. उत्पन्न, जात, अधिवास, विविध दाखले, विविध प्रमाणपत्रे, शिष्यवृत्ती अर्ज, शासनाच्या योजनांसाठी नोंदणी, विविध विभागांच्या ऑनलाइन सेवा अशा अनेक सुविधा आपले सरकार सेवा केंद्रातून उपलब्ध होत आहेत. मात्र प्रत्येक नागरिकाला, विशेषतः ग्रामीण भागातील ज्येष्ठ

नागरिक, अल्पशिक्षित व्यक्ती किंवा प्रथमच ऑनलाइन सेवा घेणाऱ्या नागरिकांना डिजिटल प्रक्रिया समजून घेणे सहज शक्य होत नाही, त्यांना प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शनाची गरज भासते. हे लक्षात घेत अजीज यांच्या केंद्रात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सेवा प्रक्रिया समजावून सांगण्यावर विशेष भर दिला जातो.

सेवा केंद्रातील काम वाढू लागल्यानंतर अजीज यांनी आपल्या सहकाऱ्यांनाही नागरिकाभिमुख सेवा देण्याचे प्रशिक्षण दिले. प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक तपासणे, कागदपत्रांमधील त्रुटी वेळेवर लक्षात आणून देणे, नागरिकांशी संयमाने संवाद साधणे आणि वेळेत सेवा उपलब्ध करून देणे या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. याचा सकारात्मक परिणाम लवकरच दिसून आला.  सेवेमुळे समाधानी झालेल्या अनेक नागरिकांनी आपल्या आप्तेष्टांना विविध कामांसाठी अजीज यांच्या केंद्रात जाण्यास सुचविले, त्यामुळे नागरिक सकारात्मकतेने त्यांच्याकडे येऊ लागले, आणि त्यांच्या केंद्राची विश्वासार्हता वाढत गेली.

आज अजीज शेख यांची ओळख आपले सरकार सेवा केंद्र चालक इतकी मर्यादित राहिलेली नाही. गावातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांना निमंत्रित केले जाते. शासनाच्या योजनांबाबत माहिती हवी असल्यास नागरिक त्यांचा सल्ला घेतात, तर युवक-युवती रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन घेतात. विश्वासार्ह सेवेमुळे त्यांना ही ओळख मिळाली आहे. अजीज यांच्या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांच्या मनातही समाधानाची भावना आहे. गावातील लोक आदराने त्यांचे नाव घेतात, हीच त्यांच्या कष्टांची खरी पावती आहे.

गावात आपले सरकार सेवा केंद्र सुरू करताना काही मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत होती. इंटरनेटची उपलब्धता, तांत्रिक सुविधा आणि इतर काही अडचणींमुळे सुरुवातीचा काळ आव्हानात्मक होता. मात्र शासनाच्या विविध उपक्रमांमुळे आणि ग्रामीण भागातील डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये होत असलेल्या सुधारणांमुळे या अडचणी हळूहळू कमी होत गेल्या. सेवा अधिक वेगाने आणि प्रभावीपणे देता येऊ लागल्या.

अजीज शेख यांना या प्रवासात आर्थिक स्थैर्य मिळाले, आणि महत्त्वाचे म्हणजे समाजाकडून विश्वास, प्रतिष्ठा आणि वेगळी ओळख मिळाली. आज त्यांच्या केंद्रातून अनेक नागरिकांना शासनाच्या विविध सेवा सहज उपलब्ध होत आहेत. प्रत्येक यशस्वी अर्जासोबत एका नागरिकाचा वेळ वाचतो, त्याचा शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो आणि डिजिटल महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळ मिळते, हे खचितच कौतुकास्पद आहे.






## डिजिटल प्रशासनाचे अग्रदूत

कोणत्याही आपले सरकार सेवा केंद्रात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी एखाद्या सकाळी जाऊन पाहा, हे चित्र तुम्हाला सहज दिसेल. एखादी वयोवृद्ध व्यक्ती चुकीची कागदपत्रे घेऊन उभी असते, एखादी तरुण मुलगी अजून न आलेल्या OTP ची वाट पाहत असते तर "प्रलंबित" म्हणजे काय, असा प्रश्न आणखी कोणीतरी विचारत असतो. खरे तर सेवा प्रदान करणारे पोर्टल सुरळीत सुरु असते, अर्ज ऑनलाइन उपलब्ध असतात, परंतु काउंटरच्या पलीकडे बसलेल्या व्यक्तीला मदत कशी करावी, हेच ठाऊक नसेल, तर पोर्टल किंवा ऑनलाइन अर्जांचा फारसा उपयोग होत नाही.

काउंटरच्या पलीकडे बसलेली ती व्यक्ती असते ग्रामस्तरीय उद्योजक (VLE). सेवा प्राप्त करण्यासाठी केंद्रात आलेल्या नागरिकांच्या



प्रश्नांना उत्तर देण्यासाठी या ग्रामस्तरीय उद्योजकांना प्रशिक्षित करावे, या दृष्टीकोनातून महाआयटीने क्षमता उभारणी कक्षाची (Capacity Building Cell-CBC) उभारणी केली आहे.

हा कक्ष सध्या नाशिक जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परिसरातून कार्यरत आहे. कक्षाची स्थापना करण्यापूर्वी महाआयटीच्या चमुने केवळ कार्यालयात बसून प्रशिक्षण आराखडा तयार केला नाही. त्यांनी 50 पेक्षा जास्त आपले सरकार सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी दिल्या, आणि तिथल्या ग्रामस्तरीय उद्योजकांबरोबरच नागरिकांशीही संवाद साधला.

या संवादातून अनेक समस्या नव्याने लक्षात आल्या. नागरिकांना अनेकदा OTP आणि SMS प्राप्त करण्यात अडचण येते तसेच नागरिक बरेचदा योग्य कागदपत्रांशिवाय येतात, असे ग्रामस्तरीय उद्योजकांनी सांगितले. नागरिकांनीही आपल्या समस्यांचे स्वरुप असेच असल्याचे मान्य केले. यावर तोडगा काय काढावा, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. बहुतेक नागरिकांना स्वतःच्या अर्जाची स्थिती तपासता येत नव्हती. काहींना एका फेरीत पूर्ण होणाऱ्या कामासाठी जास्त फेऱ्या माराव्या लागल्या होत्या. या सर्व समस्यांची नोंद घेतल्यानंतर ग्रामस्तरीय उद्योजकांसाठी राबवायच्या अभ्यासक्रमाचे स्वरुप निश्चित झाले.

महाआयटीचा क्षमता उभारणी कक्ष (CBC) आणि विद्यापीठाने (YCMOU) "Digital Governance and Citizen Enablement" या विषयावर नव्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची रचना केली. या अभ्यासक्रमाला सुरुवातीला YCMOU च्या Academic Council कडून तत्वतः मान्यता मिळाली आणि आता Academic Committee नेही याला मंजुरी दिली आहे. हे या प्रकल्पाचे मोठे यश आहे. हा अभ्यासक्रम आता केवळ कागदावर राहिलेला नाही, तो आता प्रत्यक्षात राबवण्यास सज्ज झाला आहे.

एकूण दोन क्रेडिट्सच्या या अभ्यासक्रमाचे सैद्धांतिक (Theory) आणि प्रात्यक्षिक (Practical) असे दोन भाग आहेत. मात्र क्रेडिटपेक्षा जास्त महत्व पाच अपेक्षित परिणामांना आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या ग्रामस्तरीय उद्योजकांनी पाच महत्वाच्या बाबी साध्य केल्या आहेत का, यावर या अभ्यासक्रमाचे यश जोखले जाणार आहे. नागरिकाशी संयमाने आणि स्पष्टपणे संवाद साधणे, डिजिटल यंत्रणा प्रत्यक्षात कशी चालते हे समजून घेणे, अर्ज पहिल्याच वेळी अचूक भरणे, निष्पक्ष आणि सहृदय वर्तणुक, आणि यंत्रणेत दुरुस्तीची आवश्यकता असल्यास ते वेळीच वरीष्ठांच्या लक्षात आणून देणे, हे ते पाच अपेक्षित परिणाम आहेत.

यंत्रणेत दुरुस्तीची आवश्यकता हा सर्वात महत्वाचा मुद्दा "Field Diary" अद्ययावत ठेवणे, या साध्या सवयीतून साध्य होण्यासारखा आहे. यात ग्रामस्तरीय उद्योजकाने कोणाचेही नाव न घेता, वारंवार

येणाऱ्या अडचणींची नोंद ठेवणे अपेक्षित आहे. कालांतराने या नोंदी Service-Improvement Note च्या स्वरूपात महाआयटीकडे पाठवल्या जातात. केवळ प्रशिक्षण घेतल्यामुळे, ग्रामस्तरीय उद्योजकाला प्रत्येक समस्या सोडवणे शक्य नसते. संथ चालणारे पोर्टल, पेमेंट फेल होणे, पावती न मिळणे या त्रुटी दूर करणे ग्रामस्तरीय उद्योजकाला शक्य नसते. पण अशा त्रुटी दुरुस्त करण्यासाठी त्या योग्य अधिकाऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम ते करू शकतात. त्या दृष्टीने इतर चार मुद्द्यांबरोबरच पाचवा मुद्दाही महत्वाचा ठरतो.

## पुढचा टप्पा – तलाठी

ग्रामस्तरीय उद्योजक या उपक्रमाचा एक भाग आहेत, त्याचप्रमाणे गावागावात जमिनीच्या नोंदी आणि नागरिकांशी संबंधित विविध सेवा हाताळणारे तलाठी सुद्धा या उपक्रमाचा अविभाज्य घटक आहेत. मात्र ग्रामस्तरीय उद्योजक आणि तलाठी यांच्या भूमिका परस्परपुरक असल्या तरी त्या स्वतंत्र आहेत. त्यामुळे या दोन्ही घटकांसाठी समान अभ्यासक्रम न राबवता, स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्याला, महाआयटीच्या क्षमता उभारणी कक्षाने प्राधान्य दिले आहे. या कामालाही सुरुवात झाली आहे.

## मार्गदर्शकांची जडणघडण

अभ्यासक्रम राबवणाऱ्या लोकांच्या कौशल्यावर त्या अभ्यासक्रमाचे यशापयश अवलंबून असते, हे लक्षात घेत महाआयटीचा क्षमता उभारणी कक्ष स्वतःच्या District Project Leads ना District Resource Persons म्हणून घडवत आहे, जेणेकरुन ते आपापल्या जिल्ह्यातील ग्रामस्तरीय उद्योजक आणि फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करू शकतील, आणि त्यांना प्रशिक्षणासाठी अवलंबून राहावे लागणार नाही.

महाआयडी आणि महासारथी या IEC उपक्रमाअंतर्गत नुकताच एक Training of Trainers कार्यक्रम झाला, ज्यात YCMOU चे शैक्षणिक समन्वयक आणि महाआयटीचे राज्यभरातील District Project Leads एकत्र आले.

## आवश्यकतेनुसार नवे भागीदार

मनुष्यबळ प्रशिक्षित करण्याच्या कामी महाआयटीच्या क्षमता उभारणी कक्षाला दोन उत्तम भागीदारांची साथ लाभणार आहे. त्यापैकी एक असणाऱ्या Digital Empowerment Foundation या संस्थेने 20 वर्षांपेक्षा जास्त काळ संपूर्ण देशभरात, तळागाळात डिजिटल साक्षरतेचे काम केले आहे तर Gram Vaani ने स्मार्टफोनऐवजी आवाज आणि फोनकॉलच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचण्याला प्राधान्य दिले आहे. Digital Empowerment Foundation या अभ्यासक्रमाच्या पथदर्शी प्रकल्पाला पाठबळ देतील तर Gram Vaani प्रत्यक्ष शिक्षण साहित्य तयार करण्यात मदत करतील. प्रशिक्षणाबरोबरच ग्रामस्तरीय उद्योजकांना अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचे पर्यायही विचारात घेतले जात आहेत.

## एक भेट मोलाची

महाआयटीचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील यांनी 27 जून 2026 रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांची भेट घेतली. या दोन दिग्गजांनी विद्यापीठ परिसरात, महाआयटीच्या क्षमता उभारणी कक्षाच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन केले. सामंजस्य करारापासून सुरुवात झालेल्या या भागीदारीने सर्वेक्षण, शैक्षणिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रम, आणि प्रत्यक्ष कार्यालयापर्यंतचा प्रवास केला आहे.

## पुढची वाटचाल

ग्रामस्तरीय उद्योजक अभ्यासक्रमाची निश्चिती, तलाठी अभ्यासक्रमाची रचना आणि प्रशिक्षक घडवत राहणे हे या उपक्रमाचे पुढचे टप्पे आहेत. एखाद्या विशिष्ट समुहाला प्रशिक्षित करताना वास्तविक परिस्थितीचा अभ्यास, समस्यांची जाण आणि या सर्वांना अनुरुप असा अभ्यासक्रम तयार करणे, या मूलभूत बाबी अत्यावश्यक असतात. नागरिकांना शासकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध देण्याच्या कामी नागरिकाइतकीच त्या नागरिकाला मार्गदर्शन करणारी व्यक्तीही महत्वाची असते. ती व्यक्ती योग्य प्रकारे प्रशिक्षित असेल, तर सुप्रशासनाचा हेतू साध्य करण्याबरोबरच डिजिटल सक्षमीकरणही शक्य होईल, पारदर्शकता वाढीस लागेल आणि जनहिताचे अंतिम ध्येय साध्य होईल, यात शंकाच नाही.

# योगदान:

**मजकूर योगदान:**
धीरेंद्र सिंग

**संपादन:**
माधुरी पांगे

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
रवींद्र गांगुर्डे
पृथ्वीराज हणमंतराव बिरादार

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे
सूर्यकांत उभे

**योगदान:**
माधुरी पांगे
दिशा खातू
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा


## आम्हाला फॉलो करा

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार


## प्रकाशक

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाउस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org